# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा दोन दिवसीय कोल्हापूर दौरा रद्द

नवी दिल्ली, दि. ७ (वृत्तसंस्था) – केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा दोन दिवसीय कोल्हापूर दौरा रद्द झाला आहे. हुबळीमधील दौरा संपवून अमित शाहांचा कोल्हापूर दौरा प्रस्तावित होता. मात्र, हुबळीतून त्यांनी दिल्ली गाठली. दरम्यान, केएलई (घडए) सोसायटीचे वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि वैद्यकीय संशोधन केंद्राचे उद्घाटन करण्यासाठी हुबळी दौऱ्यावर असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह प्रकृती अस्वास्थ्यामुळे नियोजित उद्घाटन समारंभाला उपस्थित राहू शकले नाहीत. काल 'डेनिसन्स हॉटेल'मध्ये मुक्काम केल्यानंतर, आज (१९ सप्टेंबर) सकाळी केएलई रुग्णालयाच्या उद्घाटन समारंभात ते सहभागी होणार होते. मात्र, प्रकृती बिघडल्यामुळे ते हॉटेलमध्येच थांबले. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र, खासदार बसवराज बोम्मई आणि माजी मंत्री मुरुगेश निराणी, सी. सी. पाटील, इराण्णा कडाडी, अभय पाटील व रमेश कट्टी यांनी उद्घाटन समारंभाला जाण्यापूर्वी हॉटेलवर जाऊन अमित शाह यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.


(वर्ष ६५ वे अंक २३६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# दुष्काळ बैठक : नेत्यांसाठी काजू-बदामांची मेजवानी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना फटकारले

नांदेड, दि. १९ (प्रतिनिधी) – मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी नांदेडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सरकारी बैठकीत नेत्यांना खाण्यासाठी काजू आणि बदामांची व्यवस्था करण्यात आल्याच्या मुद्द्यावरुन वाद निर्माण झाला आहे. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. राज्यात शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट असताना मंत्री आणि सरकारी अधिकारी काजू, बदामावर ताव मारत असल्याच्या मुद्द्यावरुन संताप अनेकांनी व्यक्त केला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना भाष्य केले. साधारणपणे आपल्याकडे पद्धत आहे बैठकांमध्ये प्रशासन ड्रायफूट आणून ठेवते. अशा गोष्टी टाळल्या पाहिजे. पण जाणीवपूर्वक दुष्काळ आहे म्हणून असं कोणीतरी करतंय, हे म्हणणे योग्य नाही. पण प्रशासनाने काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि संवेदनशीलपणे वागले पाहिजे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. राज्यातील अनेक जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पाऊस नसल्याने पिकं खराब झाली आहेत. उतारा कमी येईल, अशी परिस्थिती आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्वच मंत्र्यांनी याबाबत चर्चा करुन आपापल्या जिल्ह्यात आढावा घेऊन तयारी करण्याचे आदेश आपण दिले आहेत. पुढच्या आठवडाभरात आम्ही प्राथमिक आढावा आणि पंचनामे करुन मदत करु, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

दरम्यानच्या काळात कर्जमाफीचे काम सुरु आहे. तीन याद्या झाल्या आहेत, उर्वरित काम वेगाने करण्याचे प्रक्रिया सुरु आहे. सर्वतोपरी शेतकऱ्यांना तातडीची मदत केली जाईल. पिण्याचे पाणी, चाऱ्याची व्यवस्था केली जात आहे. यावेळी अल निनो संकटामुळे आपण वैरण विकास कार्यक्रम हाती घेतला होता. त्यामुळे चाऱ्याची टंचाई असेल तिकडे व्यवस्था केली जाईल. संध्याकाळच्या वेळी शेतीसाठी अतिरिक्त वीज देण्याची तजवीज केली आहे.

सगळ्या भागात आपण अतिरिक्त वीज देत आहोत (पान ४ वर)



### हिंगोलीत संतप्त शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्यांनाच दिली काजू-बदामाची प्लेट

मराठवाड्यात पावसाने दडी मारल्याने अनेक भागांत शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाअभावी पिके करपल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. शनिवारी त्यांनी हिंगोली जिल्ह्यातील काही भागांत जाऊन शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत पिकांची पाहणी केली. मात्र, यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्यांचा ताफा अडवत सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले.

> "नांदेड येथील विभागीय दुष्काळ आढावा बैठकीत मंत्री, खासदार आणि आमदारांसमोर काजू-बदामाच्या प्लेट्स ठेवण्यात आल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर वाद निर्माण झाला. खासदार संजय (बंडू) जाधव हे सुका मेवा खाताना दिसल्याने त्यांच्यावर टीका झाली. पत्रकारांनी याबाबत विचारणा केली असता, मी काय माणूस नाही का? भूक लागली म्हणून खाल्ले. ५०-१०० रुपयांच्या सुकामेव्यावरून राईचा पर्वत कशाला करता? असे म्हणत त्यांनी माध्यमांवर नाराजी व्यक्त केली. तसेच, काजू-बदाम कोणी ठेवले याबाबत प्रशासनाला प्रश्न विचारावेत.
>
> **– खासदार संजय (बंडू) जाधव**

> "मराठवाड्यासह राज्यात पावसाने ओढ दिल्याने पिके करपत असून शेतकरी संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड येथे आयोजित दुष्काळ आढावा बैठकीत काजू-बदाम ठेवण्यात आल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या प्रकारावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. शिवसेना नेते व मंत्री संजय शिरसाट यांनी बैठकीला आपण पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे उपस्थित नव्हतो. अधिकारी काजू-बदाम आणून ठेवतात बदनाम लोकप्रतिनिधी होतात, या प्रकाराबाबत आपण विभागीय आयुक्तांना सूचना करणार.
>
> **– संजय शिरसाट, पालकमंत्री छत्रपती संभाजीनगर**

## दिशा सालियाचे वडिल थेट 'मातोश्री'वर; ठाकरेंच्या वकिलांनी अब्रूनुकसानीची नोटीस स्वीकारली



मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – दिशा सालियान मृत्यू प्रकरणात दररोज नवनवीन धक्कादायक घडामोडी समोर येत असून, आता तिचे वडील सतीश सालियान यांनी आदित्य ठाकरे आणि अनिल देशमुख यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा ठोकला आहे. आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणाबाबत केलेल्या सोशल मीडिया पोस्टनंतर हे पाऊल उचलण्यात आले असून, याच दाव्याची नोटीस देण्यासाठी सतीश सालियान यांनी आज थेट ठाकरेंच्या 'मातोश्री' निवासस्थानावर मोर्चा काढला.

सतीश सालियान हे वकिलांच्या टीमसोबत मातोश्रीच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहोचल्यानंतर शिवसैनिकांनी त्यांना अडवले. तसेच गेट देखील बंद करण्यात आले होते. यावेळी सालियान यांच्या वकिलांनी ५०० कोटींच्या अब्रूनुकसानीची नोटीस आदित्य ठाकरे यांच्या वकिलांना दिली.

माध्यमांशी बोलताना दिशाच्या वडिलांनी मोठा दावा केला आहे, ते म्हणाले, उशीर का होईना सीबीआयने गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मुंबई पोलिसांच्या चुकीच्या गोष्टीने सर्व बनाव रचून ही केस दाबण्याचा प्रयत्न केला. कॉमन मॅनची ताकद आम्ही दाखवू, असा इशारा सतीश सालियान यांनी दिला आहे. ते म्हणाले, मी आज मातोश्रीवर पत्र घेऊन जाणार आहे. त्या सरकारमध्ये असलेल्या नेत्यांच्या सांगण्यावरून पोलिसांनी हे सर्व केले. मात्र आम्हाला न्यायची अपेक्षा आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

वकील निलेश ओझा म्हणाले या प्रकरणावर बोलताना म्हणाले, त्यांनी आम्हाला धमक्या दिल्या, तुम्ही येऊन दाखवा, नोटीस देऊ देणार नाही, बघून घेऊ, त्यामुळे आम्ही स्वतः जाणार आहोत. नाहीतर आम्ही न्यायालयामार्फत नोटीस देऊ शकत होतो. आमच्याकडे जो सर्वात मोठा पुरावा होता, तो व्हिडिओचा होता आणि आम्ही तो सीबीआयला कालच दिला आहे. त्यामुळे आता तसा तपास होईल. हायकोर्टच्या निर्देशानुसार आता तपास होणार आहे. सुप्रीम कोर्टात देखील आम्ही सर्व काही दिले आहे, आम्हाला विश्वास आहे की आता आम्हाला न्याय मिळेल, असे त्यांनी म्हटले आहे.

**नितेश राणेंची ठाकरे आणि राऊतांवर सडकून टीका–** या प्रकरणावरून मंत्री नितेश राणे यांनी आदित्य ठाकरे आणि संजय राऊत यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. आदित्य ठाकरे ड्रग्स सेवन करतायत असे आम्ही ऐकतोय आणि त्याचा साठा संजय राऊतला दिलेला दिसतोय. ते नेहमीसारखे वेड्यासारखे करतायेत. किती वर्ष तीच टेप रेकॉर्डर आम्ही ऐकतोय. एवढी वर्षे तुमची सत्ता होती, तेव्हा तुम्ही चौकशी का केली नाही? तुम्हाला कोणी थांबवले होते? स्वतः उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना चौकशी का केली नाही? लोकही आता याला कंटाळले आहेत.

**'ही एका बापाची लढाई, संजय राऊतांनी गप्प बसावे'** – या प्रकरणात राजकारण न आणण्याचे आवाहन करत नितेश राणे पुढे म्हणाले की, संजय राऊत किंवा उबाठाचे लोक जेवढे तोंड उघडतील, तेवढा मालकाचा मुलगा अडचणीत येणार आहे. आम्हाला यात बिलकुल राजकारण करायचे नाही. ही एका बापाची आपल्या मुलीसाठी असलेली लढाई आहे.

## राज ठाकरेंकडून युपीआय शुल्कावरुन सरकारच्या बदलेल्या भूमिकेची चिरफाड

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) –केंद्र सरकारनं यूपीआयद्वारे पर्सन टू मर्चंटच्या २ हजार रुपयांवरील व्यवहारांवर ०.०४ टक्के एमडीआर लावण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय १५ ऑक्टोबरपासून लागू होणार आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचा विरोधी पक्षांकडून विरोध करण्यात आला आहे. पेट्रोल पंप डीलर्स असोसिएशननं २००० रुपयांवरील डिजीटल पेमेंट न स्वीकारण्याचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारच्या निर्णयाच्या हेतूवरच प्रश्नचिन्ह उभं केलं आहे. राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून भूमिका मांडली आहे. दारावरची टकटक! या शिर्षकासह त्यांनी पोस्ट शेअर केली आहे. णझख व्यवहारांवर सरसकट नाही पण शुल्क लावून भारतीयांवर मग ते व्यापारी असोत की ग्राहकांना डिजिटल सापळा लावल्याची टीका राज ठाकरे यांनी केली आहे.



केंद्र सरकारने युपीआय व्यवहारांवर 'मर्चंट डिस्काउंट रेट' अर्थात सोप्या भाषेत युपीआय व्यवहारांवर अगदी सरसकट नाही पण शुल्क लावून भारतीयांवर मग ते व्यापारी असोत की ग्राहक यांच्यावर, 'डिजिटल सापळा' लावला आहे. आधी नोटबंदी करून मग आता आम्ही कसं डिजिटल व्यवहाराला चालना देतोय हे दाखवत युपीआय व्यवस्था आणली. मग त्याचा गाजवजा केला, स्वतःची स्तुती करून घेतली, लोकांना सवय लावली आणि अचानक एकेदिवशी घोषित करून टाकलं की आता या व्यवहारांवर शुल्क लागेल. थोडक्यात नागरिकांना गुंगवत ठेवलं आणि हळूच 'डिजिटल सापळ्यात' पकडलं. मी गेली अनेक वर्ष सांगतोय की गाफील राहू नका किंवा सगळं किती आलबेल आहे आणि किती छान सुरु आहे असं अजिबात मानू नका. तुमच्या दारांवर हे सरकार कधीतरी टकटक करणार. आणि त्याची सुरुवात झाली आहे. सरकारने डिजिटल व्यवहारांसाठी युपीआय व्यवस्था आणली. तिला प्रतिसाद मिळेल असं बघितलं आणि तिला प्रतिसाद मिळाला हे सगळं ठीक आहे. पण जर हेतू डिजिटल पेमेंट व्यवस्था आणून आर्थिक देवाणघेवाण सोपी करणं इतका स्वच्छ होता, तर ज्या दिवशी या पेमेंटच्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये गुंतवणूक केली तेंव्हाच ती चालत राहावी आणि सामान्य माणसांच्या खिशाला झटका बसू नये म्हणून तरतूद का नाही केली ? अशा पेमेंट व्यवस्थांसाठी (पान ४ वर)

## पावसाचं कमबॅक! पिकांना नवसंजीवनी, विजांच्या कडकडाटासह मराठवाडा-विदर्भात पाऊस

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – राज्यात काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली तर काही ठिकाणी अद्याप पावसाची प्रतित्रा आहे. तर कालपासून(शुक्रवारी, ता १८) मराठवाड्यात पावसाने हजेरी लावली. गेल्या दीड महिन्यांच्या विश्रांतीनंतर पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. पावसाच्या आगमनामुळे शेतकरी सुखावला आहे. परभणी, लातूर, हिंगोली, धाराशिव आणि जालनामध्ये पावसाची हजेरी पाहायला मिळाली. तर काल रात्री उशिरा विदर्भातील भंडारा वाशिममध्ये पाऊस बरसला. रात्री उशिरापर्यंत भंडारा जिल्ह्यात सर्वदूर विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली.

काल सायंकाळी विजांच्या कडकडाटासह सुरू झालेला पाऊस भंडारा जिल्ह्यातील अनेक भागात रात्री उशिरापर्यंत सुरू होता. सात दिवसांच्या विश्रांतीनंतर आलेल्या या पावसामुळं वातावरणात निर्माण झालेल्या उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. सोबतचं भातपीक आणि भाजीपाला वर्गीय पिकांसाठी हा पाऊस समाधानी ठरला आहे. या पावसामुळं मात्र, काल रात्री ज्यांच्याकडं गणपती आणि गौराई निमित्त जेवणाचा कार्यक्रम होता, अशांची मात्र चांगलीचं तारांबळ उडाली होती. तर वाशिम जिल्ह्यात आज पहाटेपासून काही भागात विजेच्या कडकडाटात मेघगर्जनेसह सलग दुसऱ्या दिवशी पावसाने हजेरी लावलीय. बरसणाऱ्या पावसामुळे काहीसा वातावरणात (पान ४ वर)

## ट्रम्पकडून १०० टक्के टॅरिफ कायद्याला मंजुरी; रशियाच्या संरक्षण क्षेत्रावरही निर्बंध

वॉशिंग्टन, दि. १९ (वृत्तसंस्था) – अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आता भारतावर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावू शकतात. ट्रम्प यांनी या विधेयकावर स्वाक्षरी करून त्याचे कायद्यात रूपांतर केले आहे. अमेरिकन संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या प्रतिनिधीगृहाने रशियाकडून सर्वाधिक तेल खरेदी करणाऱ्या पाच देशांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावणारे विधेयक मंजूर केले. या विधेयकाच्या बाजूने २६२ आणि विरोधात १५९ मते पडली.

सिनेटने ऑगस्टमध्ये ८६-११ मतांनी हे विधेयक मंजूर केले होते. याचे अधिकृत नाव 'लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट ऑफ २०२६' असे आहे. रशियाकडून सर्वाधिक कच्चे तेल खरेदी करणाऱ्या पाच देशांच्या अमेरिकन यादीत चीन, भारत, स्लोव्हाकिया, हंगेरी आणि अझरबैजान यांचा समावेश आहे. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ४० टक्क्यांपेक्षा जास्त तेल रशियाकडून खरेदी करतो.

**गेल्या दोन वर्षांतील रशियाकडून भारताची तेल आयात** – अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी दर १८० दिवसांनी या यादीचे मूल्यांकन करतील. अमेरिकेने लावलेल्या १०० टक्के शुल्काबाबत, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते की देशाच्या हिताशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर, भारताने रशियाकडून स्वस्त कच्च्या तेलाची खरेदी वेगाने वाढवली. २०२२-२३ मध्ये रशिया भारताचा सर्वात मोठा तेल पुरवठादार बनला. युद्धापूर्वी, भारत रशियाकडून खूप कमी तेल खरेदी करत असे, परंतु नंतर हा आकडा दररोज (पान ४ वर)

## महायुती सरकारमधील सहकार मंत्र्याला रिझर्व्ह बँकेचा दणका

लातूर, दि. १९ (प्रतिनिधी) – महायुती सरकारमधील सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यावर रिझर्व्ह बँकेने थेट नियमभंगाची कारवाई करत संचालकपदावरून बडतर्फ केले आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ राहिल्याने आरबीआयच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवत ही धडक कारवाई करण्यात आली आहे.



**नेमके प्रकरण काय आहे?**

लातूर येथील बँकेचे सभासद आणि अधिकृत मतदार प्रतिनिधी सतीश शेषराव जाधव यांनी २५ मे २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे तक्रार दाखल केली होती. बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम, २०२५ मधील नियमांनुसार, कोणत्याही सहकारी बँकेत १० वर्षांपेक्षा जास्त काळ संचालक पद भूषवलेली व्यक्ती पुढील निवडणुकीसाठी अपात्र ठरते.

या कायद्याच्या आधारे लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान १९ संचालक मंडळातील ८ संचालकांनी १० वर्षांपेक्षा अधिक काळ काम केल्याचा दावा करत त्यांच्या अपात्रतेची मागणी करण्यात आली होती. यामध्ये मंत्री बाबासाहेब पाटील यांचाही समावेश आहे. याशिवाय बँकेत सुरू असलेली कथित बेकायदेशीर नोकरभरती रद्द करून प्रशासक नियुक्त करण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली होती.

**हायकोर्टाचे निर्देश अन् आरबीआयची कारवाई**

सतीश जाधव यांनी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती. ३ ऑगस्ट २०२६ रोजी न्यायालयाने संबंधित प्राधिकरणाला २५ मे रोजीच्या तक्रारीवर गुण-दोषांच्या आधारे सहा आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. न्यायालयाच्या निर्देशानंतर आणि तक्रारीतील आक्षेपानंतर बँकेच्या आठपैकी सात संचालकांनी आपापल्या पदांचे राजीनामे दिले. मात्र, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी राजीनामा दिला नव्हता. (पान ४ वर)

# जुने पूल पाडणार, नवा 'अखंड' उड्डाणपूल उभारणार

## छत्रपती संभाजीनगरमध्ये ४ हजार कोटींच्या उड्डाणपुलाची लवकरच निविदा- संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर शहरातील वाहतूक व्यवस्थेला मोठा बदल घडवून आणणाऱ्या प्रस्तावित उड्डाणपुलाच्या कामाला आता वेग येण्याची शक्यता आहे. शेंद्रा येथून सुरू होऊन बजाजनगरमधील ओएसिस चौकाच्या पुढे जाणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी तब्बल ४ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाची घोषणा केल्यानंतर आता त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल म्हणजेच DPR तयार करण्याचे काम सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

**शेंद्रा ते बजाजनगरपर्यंत सलग मार्ग** – शेंद्रापासून सुरू होणारा हा प्रस्तावित उड्डाणपूल केंब्रिजच्या पुढील भागातून पुढे जात बजाजनगर येथील ओएसिस चौकाच्या पुढे जाणार आहे. शहराच्या वाढत्या विस्ताराचा आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेऊन हा प्रकल्प आखण्यात आला आहे. या संपूर्ण मार्गासाठी आवश्यक असलेल्या आराखड्यावर सध्या अंतिम स्वरूप देण्याचे काम सुरू असल्याचे शिरसाट यांनी स्पष्ट केले.

**मराठवाड्यातील सर्वात लांब उड्डाणपूल?** – शिरसाट म्हणाले, शेंद्रा-केंब्रिज परिसरापासून सुरू होणारा हा उड्डाणपूल मराठवाड्यातील सर्वात लांब उड्डाणपूल (१८ किलो मीटर) ठरण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली असली तरी त्याचा उल्लेख यापूर्वी अर्थसंकल्पाच्या वेळी सभागृहातही करण्यात आला होता. त्यामुळे घोषणेनंतर आता प्रत्यक्ष प्रशासकीय प्रक्रियेला सुरुवात झाल्याचे शिरसाट यांनी सांगितले.

**दोन ते तीन टप्प्यांत काम पूर्ण होणार** – ४ हजार कोटी रुपयांचा हा मोठा प्रकल्प एकाचवेळी पूर्ण करण्याऐवजी दोन ते तीन टप्प्यांत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. प्रकल्पाचा आराखडा अंतिम करण्याचे काम सुरू असून, त्यानंतर निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे येत्या काही महिन्यांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

**तीन महिन्यांत टेंडर फ्लोट – होण्याची शक्यता**

या प्रकल्पासाठीचा उझठ तयार झालेला असून त्यावर अंतिम हात फिरवण्याचे काम सुरू असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. येत्या तीन महिन्यांत या कामाची निविदा अर्थात टेंडर फ्लोट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण झाल्यास प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला लवकर सुरुवात होऊ शकते.

**जुने पूल पाडून नवीन अखंड पूल** – सध्या अस्तित्वात असलेल्या पुलांचे काय होणार, असा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर शिरसाट यांनी त्याबाबतही भूमिका स्पष्ट केली. यापूर्वी बांधण्यात आलेले पूल त्या वेळच्या गरजा आणि लोकसंख्येचा विचार करून उभारण्यात आले होते. मात्र, शहराची वाढ आणि वाहतुकीचा वाढलेला ताण पाहता हे पूल आता अपुरे ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

'सगळे जुने पूल डिमॉलिश होतील' – सध्याचे पूल पाडून त्यांच्या जागी एका अखंड उड्डाणपुलाची निर्मिती केली जाणार असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. त्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या पुलांऐवजी एकसंध आणि सलग उड्डाणपूल उपलब्ध होणार आहे. या नव्या रचनेमुळे वाहतूक व्यवस्थेत सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते.

**मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर आता अंमलबजावणीचा टप्पा** – मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनंतर उझठ तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दिशेने पुढचे पाऊल पडले आहे. पुढील तीन महिन्यांत निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता असल्याने आता या प्रकल्पाकडे संभाजीनगरकरांचे लक्ष लागले आहे. मात्र, ४ हजार कोटींच्या या मोठ्या प्रकल्पासाठी प्रशासकीय मंजुरी, निविदा आणि प्रत्यक्ष बांधकामाचा कालावधी याबाबत पुढील टप्प्यांत अधिक स्पष्टता येणार आहे.

## पाक लष्कर-दहशतवाद्यांमधील चकमकीत ८ दहशतवादी ठार

इस्लामाबाद, दि. १९ (वृत्तसंस्था) – पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वामधील कोहाट येथे सैन्य आणि दहशतवाद्यांमध्ये २० तास चकमक सुरू होती. शनिवारी प्रांताच्या पोलिसांनी सांगितले की, या कारवाईत ८ दहशतवादी ठार झाले असून, त्यानंतर चकमक संपली.

हे तेच दहशतवादी होते, ज्यांनी एक दिवस आधी स्फोटकांनी भरलेली कार पोलिस संकुलातील मशिदीच्या गेटवर धडकवली आणि त्यानंतर गोळीबार सुरू केला. या हल्ल्यात आतापर्यंत ३१ जणांचा मृत्यू झाला आहे, त्यामध्ये १६ पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. १०० हून अधिक जण जखमी झाले आहेत.

**मशिदीत नमाजदरम्यान स्फोट, भिंती कोसळल्या**

शुक्रवारी दुपारी पोलिस कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य परिसरात असलेल्या मशिदीत नमाज अदा करत होते. त्याचदरम्यान हल्लेखोर स्फोटकांनी भरलेली कार घेऊन आले आणि ती मशिदीच्या भिंतीवर आदळवली. मोठा स्फोट झाल्यानंतर काही हल्लेखोरांनी परिसरात घुसून पोलिस आणि सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केला. स्फोटामुळे मशिदीच्या भिंती कोसळल्या आणि अनेकजण ढिगाऱ्याखाली दबले गेले. घटनास्थळाच्या छायाचित्रांमध्ये मोठ्या प्रमाणात विटा-दगड आणि तुटलेल्या भिंती दिसून आल्या. हल्ल्याचे ठिकाण कोहाटमधील ओल्ड पोलिस लाइन्स परिसर होते. हे सामान्य पोलिस ठाणे नसून जिल्हास्तरावरील मोठे पोलिस मुख्यालय आहे. येथे काउंटर टेररिझम डिपार्टमेंट, स्पेशल ब्रांच आणि पोलिसांच्या इतर युनिटची कार्यालये आहेत. हल्ल्यानंतर काही हल्लेखोर परिसरातील स्पेशल ब्रांचच्या इमारतीत लपले होते. रात्रीही गोळीबार सुरू होता.

# विद्यार्थ्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा

मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. ही त्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटा आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत. त्यामुळे त्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा. आपल्याकडे अपेक्षेप्रमाणे मोबाइलच्या अतिवापरा संदर्भातील दुष्परिणामाबाबत जनजागृती होत नाही. ती होणे गरजेचे आहे.

पल्या लोकशाहीप्रधान भारत देशाचा १५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहाने आणि विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. म्हणजे आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे पूर्ण झाली. मात्र मोबाइलचा विचार करता वैज्ञानिक युगात वावरणारे आजचे विद्यार्थीवर्ग मोबाइलचा अतिवापर करताना दिसत आहेत. मोबाइलच्या अतिवापरामुळे मुलांची विचार करण्याची शक्ती हळूहळू कमी होते. काही वेळा आपण काय करावे आणि काय नाही याची कल्पना मुलांना येत नाही. त्यात ते कधी कधी गोंधळून जातात. हे त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने घातक आहे. तेव्हा देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य वर्षापासून मोबाइलचा अतिवापर करणार नाही यासाठी केवळ विद्यार्थीच नव्हे तर आपण सर्वजणांनी आज वचनबद्ध होऊया.

मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. ही त्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटा आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत त्यामुळे त्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा. मोबाइलचा वापर आवश्यक कामासाठीच करण्यात यावा. सध्या तरी विद्यार्थ्यांना मोबाइलचे व्यसन लागले आहे. कायम त्यांच्या हातात मोबाइल दिसतो, तो दूर ठेवणे आवश्यक आहे. याचा परिणाम त्यांच्या डोळ्यांना त्रास होणे, झोप न लागणे, मानसिक दडपण, मन चलबिचल होणे, थोरांचे ऐकायचे नाही, मनमानी कारभार, मान व पाठ दुखी अशा अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. काही मुले तर झोपेत सुद्धा हातात मोबाइल धरून झोपतात. त्यात काही उशीच्या खाली लपवून मोबाइल ठेवतात. डॉक्टर सांगतात, आपण झोपताना मोबाइल दूर ठेवावा, याचे काय? तेव्हा देशातील सुजाण नागरिकांनी विचार करून उद्यापासून म्हणण्यापेक्षा आजपासून मोबाइलला दूर ठेवून योग्य ती काळजी घेतली पाहिजे. आजच्या युगात मोबाइल ही मूलभूत गरज झाली असली तरी त्याचा अतिवापर टाळावा. तेव्हा यात इतरांना दोष देण्यापेक्षा आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची असते. मात्र हल्ली काही मुले आई-वडिलांचे ऐकत नाहीत.

तुम्हाला काय कळते? असा प्रती सवाल आपल्या आई-वडिलांना करतात. तेव्हा घरात भांडण नको म्हणून आई-वडील दुर्लक्ष करतात. अलीकडे तर मोबाइलचा विचार करता मोबाइलच्या अतिवापरामुळे मुलांची पुरेशी झोप होत नाही. म्हणजे कारण नसताना जागरण होते. हे जागरण आरोग्याला अपायकारक असते. याऐवजी एखादा खेळ खेळणे गरजेचे आहे. म्हणजे तेवढा ताण डोळ्यांवर येत नाही. म्हणूनच आवश्यक कामासाठी मोबाइलचा वापर करावा म्हणजे मोबाइलचा वापर कमी होईल किंवा मोबाइल वापरण्यावर मर्यादा येईल. ही आरोग्यासाठी चांगली बाब आहे. मी आवश्यक कामासाठी मोबाइलचा वापर करीन असे प्रत्येकांनी ठरविले पाहिजे. तसेच मोबाइलवर जास्त न बोलता आवश्यक तेवढेच बोलेन असे ठरवावे. त्यासाठी प्रत्येकांनी वेळेचे नियोजन करणे गरजेचे आहे. केवळ मोबाइलवर वेळ घालविण्यापेक्षा आपल्या कुटुंबीयांसमवेत व मित्रांसोबत काही वेळ गप्पागोष्टीत घालवावा. तेवढे मन मोकळे होते. महत्त्वाची बाब म्हणजे, अशांसोबत मनमोकळेपणाने वेळ घालवावा, यातूनच खरी ऊर्जा मिळते. आजच्या तरुणाईला अशा गप्पागोष्टींची गरज आहे. तेव्हा मोबाइलच्या वापरावर स्वतःहून निर्बंध घातले पाहिजेत. उदाहरणार्थ सकाळी चहा, नाश्ता, जेवण करताना मोबाइलवर बोलू नये. तसेच झोपल्यावर मोबाइल आपल्यापासून दूर ठेवावा. केवळ मोबाइल एके मोबाइल नको तर आपल्याला मनोरंजनाकडे सुद्धा लक्ष द्यावे लागेल. मनोरंजनामुळे आपले मनोरंजन होत असते, त्याचप्रमाणे मन सुद्धा मोकळे झाल्याने कोणत्याही प्रकारचे दडपण येत नाही. तेवढा डोळ्यांना सुद्धा आराम मिळतो. एखाद्या विषयावर एकमेकांशी सुसंवाद साधावा म्हणजे तेवढीच आपल्या ज्ञानात भर पडत असते. त्यात अधिक आराम हवा असेल तर काही काळ मोबाइल बंद करून ठेवल्यास अधिक चांगले. मात्र कामात अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी. काही वेळा आपल्या कुटुंबाचा सल्ला घ्यायला काहीच हरकत नाही. त्याचे पालन करणे आपल्या हातात आहे. चांगल्या सल्ल्यामुळे आपले मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. कारण घरगुती सल्ला हा अनुभवातून व मोफत असतो, हे विसरता कामा नये.

मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत. याचा सर्वात जास्त दुष्परिणाम डोळ्यांवर झालेला दिसून येत आहे. याचा परिणाम अतिवापर करणाऱ्या मोबाइलधारकांच्या शरीरावर होऊ लागला आहे. ही त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने चांगली गोष्ट नाही. तेव्हा मोबाइलच्या दुष्परिणामाविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे. आपल्याकडे अपेक्षेप्रमाणे मोबाइलच्या अतिवापरा संदर्भातील दुष्परिणामाबाबत जनजागृती होत नाही. ती होणे गरजेचे आहे. यासाठी आरोग्य विभागाने व जागृत नागरिकांनी पुढे येऊन आवाज उठविला पाहिजे. ही विद्यार्थ्यांसाठी आजच्या काळाची गरज आहे. कारण भारत हा तरुणांचा देश आहे, असे आपल्या देशाचे माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आपल्या भाषणात म्हणत असतात. तेव्हा देशातील तरुण तंदुरुस्त होण्यासाठी त्याला मोबाइलच्या अतिवापराच्या दुष्ट चक्रातून बाहेर काढावे लागेल. तसेच मुलांनी सुद्धा मोबाइलचे दुष्परिणाम लक्षात घेऊन सतर्क राहायला हवे. तेव्हा देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य वर्षांत सध्याच्या विद्यार्थ्यांना भविष्यात निरोगी जीवनशैली जगण्यासाठी आतापासून मोबाइलचा अतिवापर टाळण्यासाठी जागरूत करूया.

## खिरापत बाप्पाची

बाप्पाच्या खिरापतीची अवीट असे गोडी
भक्तांना मिळते थोडी, थोडी
बाप्पाची आरती सकाळ-संध्याकाळ
बाप्पाच्या खिरापतीचा असे सुवर्ण काळ
बाप्पाची खिरापत खूप, खूप गोड
दहा दिवस असते खिरापतीची ओढ
खिरापतीचा आनंद भक्तात भारी
बाप्पाची सेवा करतात सारी
खिरापत वाटू मोदक वाटू
सुख, शांतीचे शिखर गाठू
बाप्पा आमचे जगी महान
गुण गाती मोठे लहान..

– धोंडीरामसिंह राजपूत

# गणपती बाप्पा : विघ्नहर्ता ते मंगलकर्ता

गणेश चतुर्थी हे मराठी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी गणेश याचा जन्म भाद्रपद शुक्ल चतुर्थीला झाला असे मानले जाते. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा 'शिवा' असेही म्हणले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल, शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे.स्त्रीमनाचे लोकदैवत असे ही श्री गणेशाला मानतात. गणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने माती पासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते. पत्रकारितेच्या इतिहासातील प्रखर तेजस्वी सूर्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या नांवे 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकारांना मिळतो. याचाच अर्थ असा लो. टिळकांच्या राष्ट्रभक्ति, लोकशक्ति आणि अन्याय मुक्तिला वाहिलेल्या ओजस्वी पत्रकारितेचे परंपरा आजही अखंड अविरत चालू आहे असाच होतो.

लोकमान्य टिळक हे ब्रिटिश सरकार बद्दल लोकांच्या मनात असंतोष निर्माण करणारे नेते म्हणून एकीकडे कार्य करीत होते. त्याचवेळी त्यांचा आवडत्या विषयांचा अभ्यासही चालू होता. त्यामुळेच राष्ट्रीय पातळीवर सामाजिक परिस्थितीवर आणि प्रासंगिक घटनांवर 'केसरी'तून लेख करतानांही टिळकांनी आर्यांचे वस्तिस्थान 'ओरायन' शास्त्रीय पंचांग 'गितारहस्य' असे ग्रंथ लिहून आपल्या अभ्यासाचा परिचय घडविला. यापुढील काळात सामाजिक सुधारणेच्या प्रश्नावरुन टिळक व आगरकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. भारतीयांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात लोकमान्य टिळकांनी १८९४ साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक, सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सावाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशोत्सव आणि शिवजयंती या प्रसंगांचे औचित्य साधून टिळकांनी युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय संस्कृतीत प्रत्येक तत्व मनावर ठासविण्यासाठी काही प्रतिके सांगीतलेली आहेत. आम्हाला बाप्पा तू सद्सदविवेक बुध्दीचे प्रतिक वाटतोस. चांगल्या वाईटाचा सत्य-असत्याचा, पाप-पुण्याचा निवाडा करण्याची क्षमता देणारा तू देव आहेस. म्हणुनच तुला बुध्दीदाता म्हटले जाते. आज समाजाला या सद्सद्विवेक बुध्दीदात्या श्री गणेशाची पूर्वी कधी नव्हती एवढी आज गरज आहे. कारण आजवर नव्हता एवढा समाज अध: पतनाच्या उंबरठयावर उभा आहे. तुझ्यापुढे उभे राहिल्या वर माणसाच्या मनातल्या सद्भावना, सहानुभुती, सह्रदयता, सज्जनता, सद्विचार, समभावना, सहभावना जाग्या होतात आणि तो 'मी' ऐवजी 'आपण' 'माझे' ऐवजी 'आपले' असा विचार करायला आपण प्रवृत्त होतो, हेच तुझे अवतार कार्य आहे.



भारतीय संस्कृतीत मूर्ती पूजाही एक थोर आणि मधुर अशी कल्पना आहे. माणसाला स्वत:चा उतरोत्तर अधिक विकास करुन घेता यावा म्हणुन जी अनेक साधने भारतीय संस्कृतीने निर्माण केली, त्यातील एक आहे मूर्तीपूजा. मनुष्य प्राणी हा जन्मत: च विभूती पूजक आहे. आपल्या पेक्षा जे मोठे आहेत, त्यांचे आपण कौतूक करतो. आपल्याहून जे थोर आहेत बुध्दीने, प्रतिमेने, विचाराने महान आहेत त्यांची पूजा करावी असे माणसाला वाटते. ही पूजा आपण त्यांच्या आदर्शाची करतो, म्हणूनच त्या आदर्शाचे अनुकरण करण्याची प्रेरणा मनाला कार्य प्रवृत्त करते. बाप्पा! तुझ्या आगमनानं आज सारं महाराष्ट्र राज्य रोमांचित, हर्ष भरित झालं आहे. खरोखरंच राज्याची काही पुण्याई आहे, म्हणुन ङ्गसंभवामि, युगे-युगेङ्ग असे म्हणत. हजार पाचशे वर्षातून केव्हा तरी एकदा अवतार घेणारा परमेश्वर, दरवर्षी नित्य-नेमाने तुझ्या रुपाने या राज्यात अवतरतो. तेव्हा गहिवरुन येतं, तुझ्या नुसत्या दर्शनाने पोर्णिमेच्या चंद्राला पाहुन सागराला भरती यावी, तशी जन सागराला उचंबळुन भावनांची भरती येते. तुझ्या नुसत्याना मोच्चाराने जीवनातील दुख: संकटे, विघ्ने, अडचणी, प्रश्न, समस्यायांना सामोरे जाण्याची शक्ति-स्फुर्ती लाभते. तुझ्या नामस्मरणात अपारसाम आहे. भारतीय संस्कृतीचे मांगल्य, तुझ्या मुर्तीत एकवटलेले आहे. उत्तुंग आणि भव्य तुझ्या मुर्तीमध्ये आम्हाला हिमालयाच्या गिरी शिखरावरील शिव, कन्याकुमारीच्या तेजस्विनीचे सौंदर्य आणि वेद-उपनिषद-रामायण-महाभारतातील, सत्याचा म्हणजे सत्य-शिव-सुंदरतेचा प्रत्यय येतो. शिवाची शक्ति, सत्त्याचे सामर्थ्य आणि सौंदर्यातील ममत्व तुझ्या ठायी सामावलेले आहे. म्हणुनच तु भक्तांच्या नवसाला पावतोस, त्यांची मनोकामना पूर्ण करतोस, त्यांच्यावरील संकटाचे निवारण करतोस कारण तू जगज्येठी आहेस, तूच कर्ता-करवीता आहेस. तुझ्या ठायी, ज्ञान-भक्ति आणि कर्मयांचा ह्रदय यंगम संगम आहे. तू खरा उदारदाता आहेस, मेघ जसे सारे पाणी देऊन टाकतात, झाडे-फळे देऊन टाकतात, फुले सुगंध देऊन टाकतात, नद्या ओलावा देऊन टाकतात, सुर्य-चंद्रप्रकाश देतात. तूही 'जो-जो वांछिले, तो तेलाहो' म्हणत साऱ्या भक्तांची इच्छापूर्ती करतोस. तू समाजाती लदंभ, आळस, अज्ञान, रुढी, भेद-भाव, उच्च निंच पणा, वौमनस्य, दारिद्र्य, दु:ख, दैन्य, दुबळेपणा, भ्याडपणा दुर व्हावा. यासाठी तुझ्या विचारांचे, प्रेरणांचे अधिष्ठान, ही आजच्या समाजाची गरज आहे. तुझ्या आगमनाने राज्याचे रुपांतर दहा दिवसांकरीता अक्षरश: तिर्थक्षेत्रात होते, अख्खा महाराष्ट्र ढवळून निघतो. सारेजण धर्म-भाषा, जाती-पंथ प्रदेश असे सारे भेद विसरुन तुझ्या दर्शनाच्या रांगेत 'भाविक' येतो, या एकाच जातीचे असतात. मनाची क्षुद्रता गळून पडलेली असते, जीवनाला सुंदर करणारे आणि मनाला सुखी करणारे असे ते रुप बाप्पा सर्वांच्यापुढे असते. दु:खाचा, समस्या, संकटाचा विसर पडलेला असता. आनंद, उत्साह, चैतन्य यांनी रोम-रोम पुलकित झालेला असतो. एका तेजाची उपासना आपण करीत आहोत, या अनुभवातून सारे गणेश भक्त तुझ्या सानिध्यात आल्यावर जात असतात. तू बुध्दीचा देव आहेस, परमेश्वर म्हणजे ज्ञान अशी आमची भारतीय संस्कृती सांगते. आम्ही सारे आस्तिक आहोत. कारण आमची तुझ्या जागृत अस्तित्वावर श्रध्दा आहेत. पण तुझे सामर्थ्य असे अगाध आहे की, तुझ्या दर्शनाने नास्तिकांचे ही रुपांतर आस्तिकात होईल. पाप्याला आपल्या पापाची लाज वाटेल, भ्रष्टाचा ज्याला शरम वाटेल हा तुझा महिमा आहे, म्हणुन तू आमच्यासाठी वरदान आहेस.

जेव्हा आम्ही पाहतो, तेव्हा गणेशोत्सव, सुरु करणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या स्वप्नांची पूर्ती बाप्पा तूझे सेवक, सामाजिक बांधिलकेच्या भूमिकेतून करतांना पाहून आम्हा भक्तांचा हात अधिक देण्यासाठी आणि ऋण फेडण्यासाठी उतावीळ होतो. अयोग्य कर्मापासून रोखतेही, मूर्तीपूजा हे मानसीक, बौध्दीक विकासाचे साधन हजारो वर्षापासून आहे. म्हणूनच बाप्पा तुझे 'अस्तित्व' चिरंतन आहे. हे ठाऊक असुनही आम्ही गणेश चतुर्थीला तुझी मूर्ती आनंदाने, अभिमानाने मिरवत देहभान विसरुन, गात-नाचत दहा दिवसांकरीता आणतो, आणि प्राणांच्या ज्योती करुन तुझ्या तेजाची आरती करतो. त्यासाठी आम्हाला तू मूर्तीरुपात हवा असतोस. तू विराट विश्वंभर आहेस, पण आम्ही तूझे पाईक आहोत. आमचे सर्व संकटापासुन ती येण्या आधीच रक्षण-निवारण कर आम्हाला सुख-समाधान, मन: शांती, आरोग्य, समृध्दि, समता-बंधुता-न्याय लाभू दे, हीच तुझ्या चरणी प्रार्थना!

– प्रविण बागडे

# फूड प्रोसेसिंग-तंत्र, कौशल्य आणि व्यवस्थापन

मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या उपक्रमांमुळे फूड प्रोसेसिंग(अन्नप्रकिया)उद्योग क्षेत्राच्या विकासाला नवी उर्जा मिळाली आहे. गेल्या काही वर्षात अन्नप्रकिया उत्पादन आणि निर्मिती घटकांमध्ये ३७ हजारावरुन ३९ हजार घटकांपर्यंत वाढ झाली. या क्षेत्रातील गुंतवणुकीची वाढ ३४ टक्के इतकी आहे. देशातील निर्यातीपैकी १३ टक्के वाटा या क्षेत्राचा आहे. देशातील प्रचंड लोकसंख्या लक्षात घेऊन परदेशी कंपन्या व उद्योगसमूह अन्नप्रकिया उद्योगांमध्ये गुंतवणूक व व्यावसायिक सहकार्य करू लागले आहेत. करारपद्धतीची शेती, कच्चा मालाचा पुरवठा इत्यादीबाबींमध्ये ही गुंतवणूक वाढलेली दिसते. न्याहारीसाठी लागणारी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, विविध ऊर्जा पेये (एनर्जी ड्रिंक्स), स्नॅक्स, केक्स, आइस्क्रीम आणि पाळीव प्राण्यांचे अन्नपदार्थ यांची निर्मिती वाढली आहे. या उद्योगवाढीसाठी डिजिटल क्रांतीही उपयुक्त ठरली आहे. मोठ्या किराणा दुकानांच्या साखळी (रिटेल)मुळे अन्नप्रक्रिया उद्योगाच्या वाढीस हातभार लागला आहे.

या क्षेत्रातील करिअर संधी मिळवण्यासाठी नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ फूड टेक्नॉलॉजी आंत्रप्रिन्युरशीप ॲण्ड मॅनेजमेंट (एनआयएफटीईएम), या संस्थेचे अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त ठरतात. ही संस्था केंद्रीय अन्न प्रकिया मंत्रालयाने, हरयाणातील कुंडली आणि तामिळनाडूतील तंजावूर येथे स्थापन केली आहे. अन्नप्रक्रिया उद्योगासाठी शिक्षण आणि प्रशिक्षण देणारी जगातील सर्वोत्कृष्ट संस्था बनण्याचे उद्दिष्ट्य या संस्थेने ठेवले आहे. या दोन्ही संस्थांना, इंस्टिट्यूट ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्सचा दर्जा देण्यात आला आहे.

अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान उद्योगाच्या गरजा लक्षात घेऊन, या संस्थांनी अभ्यासक्रमाची संरचना केली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, नव्या संकल्पनांचा अधिकाधिक वापर उमेदवारांना करता यावा यासाठी अभ्यासक्रमात भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या क्षेत्रात उत्तमोत्तम संधी मिळू लागल्या आहेत.

एनआयएफटीइएम – कुंडली

अभ्यासक्रम – बी. टेक इन फूड टेक्नालॉजी ॲण्ड मॅनेजमेंट – या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी दोन पद्धती अवलंबल्या जातात – (१) जॉईंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन – जेईई(मेन) या परीक्षेतील गुणांच्या आधारे प्रवेश प्रक्रिया, जॉईंट सिट ॲलोकेशन ॲथॉरिटी / सेंट्रल सिट ॲलोकशन बोर्डामार्फत राबविली जाते. या प्रक्रियेव्दारे १०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. (संपर्क- लीरल. पल.ळप), (२) या संस्थेव्दारे थेट प्रवेश प्रकिया राबवली जाते, याव्दारे ५० विद्यार्थी जेइइ मेन, ३० विद्यार्थी सीयुइटी-युजी (कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट-अंडर ग्रज्युएट), २० विद्यार्थी नीट (नॅशनल इलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट)मधील गुणांवर निवडले जातात.

अर्हता – भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयासह १२ वीमध्ये खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना ६० टक्के आणि राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना ५५ टक्के गुण मिळायला हवेत. या अभ्यासक्रमात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या दोन घटकांचा समावेश असल्याने, विद्यार्थी संबंधित उद्योगक्षेत्रात कोणतीही तांत्रिक आणि व्यवस्थापकीय जबाबदारी समर्थपणे सांभाळू शकतो.

करिअर संधी – हा अभ्यासक्रम केल्यावर पुढील करिअर संधी प्राप्त होतात – (१) प्रॉडक्ट डेव्हलपमेंट सायंटिस्ट, (२) सेन्सरी सायंटिस्ट, (३) फूड मायक्रोबायलॉजिस्ट,(४) फूड ॲनॅलिस्ट, (५) क्वालिटी कंट्रोल मॅनेजर,(६) फूड प्रोसेसिंग इंजिनीअर, (७) फूड रेग्युलेटरी इंजिनीअर, (८) फूड रेग्युलेटरी अफेअर्स स्पेशॅलिस्ट, (९) न्युट्रिशन स्पेशॅलिस्ट,(११) सप्लाय चेन, कोल्ड चेन लॉजिस्टिक्स स्पेशॅलिस्ट,(१२) फूड फरमेंटेशन स्पेशॅलिस्ट,(१३) फूड प्रोसेसिंग सेक्टर – स्नॅक फूड, डेअरी फूड, वायनरी, शितपये, प्राण्यांचे मास, (१४) फूड सर्विस सेक्टर – हेल्थ ॲण्ड वेलनेस सर्विस प्रोव्हायडर्स, फूड रेग्युलेशन, फूड रिटेलिंग, सप्लाय चेन, पोस्ट हार्वेस्ट, (१५) व्यवस्थापक, (१६) तंत्रोव्यवस्थापक,(१७) सल्लागार, प्रवेश प्रकिया – दोन पद्धतीने प्रवेश दिला जातो. (१) ग्रॅज्युएट ॲप्टिट्यूड टेस्ट फॉर इंजिनीअरिंग (गेट),(२) ज्या विद्यार्थ्यांनी गेट परीक्षा दिली नसेल, अशा विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत घेण्यात येणारी चाळणी परीक्षा द्यावी लागते.

– सुरेश वांदिले

# यु. पी. आय शुल्क-सरकारसाठी पेनी वाईज, पाऊंड फुलिश ठरणार का?

**नुकतीच** केंद्र सरकारने 'युनिफाइड पेमेंट इंटरफेस'(यू पी आय ) व्यवहारांवर १५ ऑक्टोबर २०२६ पासून शुल्क आकारणीची घोषणा केली आणि त्यावरून राजकीय आरोप /प्रत्यरोपांची राळ उठली आहे. काही विरोधी पक्षांनी भारत सरकारवर अमेरिकेला शरण गेल्याचा आरोप केला आहे आणि ही शुल्कआकारणी ताबडतोब मागे घेण्याची मागणी केली आहे. ही मागणी करणाऱ्यात कॉंग्रेस आघाडीवर आहे. जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी मात्र सरकारच्या निर्णयाला पाठिंबा दिला आहे. उमर अब्दुल्ला हे कॉंग्रेसच्या 'इंडी' आघाडीत आहेत हे उल्लेखनीय आहे.

'यूपीआय' व्यवहारांवर व्यापाऱ्यांसाठी 'मर्चन्ट डिस्काउंट रेट ' (एम डी. आर ) लावण्याचा निर्णय संसदेच्या स्टँडिंग कमिटीच्या शिफारशीनुसार घेतला असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. या स्टँडिंग कमिटीमध्ये कॉंग्रेसचे एकूण ५ खासदार सदस्य होते. त्यात पी. चिदंबरम तसेच मनीष तिवारी यासारखे कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते सामील होते. स्टँडिंग कमिटीने एकमताने ही शिफारस केल्याचे समजते. असे म्हणतात की पी. चिदंबरम यांनी हे शुल्क ताबडतोब लागू करावे असे मत मांडले. एकीकडे कॉंग्रेसचे सदस्य शुल्क लावायला पाठिंबा देतात तर त्यांचेच नेते राहुल गांधी या एम डी आर वरून भाजप सरकारवर टीका करत आहेत हा विरोधाभास लक्षात घेणे जरूर आहे. त्याचाच अर्थ कॉंग्रेसमध्ये या विषयावर मतभेद आहेत हे लपून राहिलेले नाही.

केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की 'पर्सन टू पर्सन' व्यवहारांवर, मग ते व्यवहार कितीही रकमेचे असले तरी कुठलेही शुल्क भरावे लागणार नाही. तसेच व्यापाऱ्यांसाठी सुद्धा २००० रुपयापर्यंतचे व्यवहार हे निशुल्क राहतील. जे मोठे व्यापारी 'कयू आर कोड' द्वारे महिन्याला रुपये १ लाखापेक्षा अधिक कमाई करतात त्यांना एम. डी आर लागू होईल. तसेच म्युच्युअल फंडसब, रेल्वे, इंधन व्यापारी, विमा यांना केलेल्या पेमेंट्सवर अगदी किरकोळ शुल्क भरावे लागेल. (पथारीवाले, किरकोळ व्यापारी यांना हे शुल्क लागू नाही).या शुल्कावर जी. एस. टी भरावा लागणार नाही. सर्विस प्रोव्हायडर सुद्धा अतिरिक्त सर्विस चार्जेस लावणार नाही हेही सरकारने स्पष्ट केले आहे.

सरकारने हा निर्णय पूर्ण अर्थशास्त्रीय तर्कशास्त्रानुसार घेतलेला आढळतो. यू. पी. आय अस्तित्त्वात येऊन १० वर्षे झाली आहेत. या व्यवस्थेला अपेक्षेपेक्षा अधिक प्रचंड प्रतिसाद मिळाला त्यामुळेच आज अब्जावधी रुपयांची लेनदेन करोडो नागरिक या सेवेमार्फत करत आहेत. ही व्यवस्था लोकप्रिय होण्याचे प्रमुख कारण म्हणजे रोख रक्कम न वापरता सुद्धा तरलता साध्य होते. कोट्यावधी लोक पैसे बरोबर बाळगणे जोखमीचे समजतात. त्याऐवजी एक मोबाईल बरोबर घेतला की काम भागते. गंमतीने असे म्हणता येईल की यु.पी.आय. ही नोटबंदीची 'देन' आहे. (वाईटातून सुद्धा चांगले निघते असे म्हणतात). दुसरे म्हणजे नेटवर्क असेल तर काही सेकंदात व्यवहार पूर्ण होतो आणि पैसे खात्यात नावे /जमा होतात. आज जगात इतक्या कमी कालावधीत इतर कुठलाही व्यवहार पूर्ण होत नाही आणि तेही कुठल्याही 'चार्ज' शिवाय. व्यापाऱ्यांना बँकेच्या माध्यमातून व्यवहार करताना हर एक व्यवहारासाठी शुल्क द्यावे लागतेच. पूर्वी चेक / बिल डिस्काउंट करून चेक क्लिअर होण्यापूर्वी आणि बिलाची ड्यू डेट येण्यापूर्वी रक्कम खात्यात जमा व्हायची. त्याबद्दल बँका काही एक 'आकार' लावत असतच. आता आर टी जी एस व एन. इ. एफ टी या सेवा सुद्धा सशुल्क आहेत. इतकेच काय ठराविक संख्येच्या पुढे चेक वापरल्यास सुद्धा हल्ली फी आहे. एवढे असूनही व्यापारी बँकामार्फत व्यवहार करतातच. मुकेश अंबानीने जिओ नेटवर्क चालू केले तेव्हा सर्व काही फुकट दिले. नंतर जिओचा ब्रँड तयार झाल्यावर ग्राहकांकडून दामदुपटीने वसुली केली. तेव्हा किती लोकांनी 'जिओ'चा त्याग केला? आज तोच जिओ भारताचा एक नंबरचा सर्विस प्रोवायडर आहे. इतकेच काय, भारतातील मोठमोठ्या देवस्थानात, रांग न लावता थेट गाभाऱ्यात जाऊन देवाचे दर्शन घेण्यासाठी सुद्धा पैसे मोजावे लागतात.

**मग सरकारने थोडे शुल्क यु पी आय साठी आकारल्यास एवढा विरोध कितपत संयुक्तिक ठरतो? –** गेल्या दहा वर्षात यु. पी. आय. पद्धत लोकांच्या एवढी अंगवळणी पडली आहे की व्यापाऱ्यांनी कयू. आर. कोड डिस्प्ले नाही केला तर ग्राहक त्याच्याकडून खरेदी करणार नाहीत. तसेच रुपये २००० पर्यंत व्यवहार निशुल्क असल्याने त्यासाठी कयू आर कोड लागेलंच. सरकारने एवढी अवाढव्य यंत्रणा उभी करण्यासाठी करोडो रुपयाची गुंतवणूक केली आहे. आता या यंत्रणेची सुरक्षितता तसेच फ्रॉडवर नियंत्रण राखण्यासाठी सुद्धा जास्त खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे व्यापारी व्यवहार सशुल्क करून या खर्चाची थोडीफार भरपाई सरकार करत असेल तर त्यात वावगे काय आहे? अर्थशास्त्रानुसार एखाद्या वस्तूची /सेवेची मागणी अलवचिक असेल तर किंमतवाढीचा कुठलाही विपरित परिणाम मागणीवर होत नाही. उदाहरणार्थ दारू, सिगरेट, पेट्रोल इत्यादी. किंमत वाढली म्हणून दारूचं, सिगारचे व्यसन / सेवन कमी होत नाही. तसंच पेट्रोलची किंमत वाढली म्हणून रस्त्यावरची वाहने कमी होत नाहीत. या वास्तविकतेप्रमाणे डिजिटल सेवांचे एक प्रकारे व्यसनच लोकांना लागले आहे. (रस्त्यावरील डोंबारी /भिकारी सुद्धा हल्ली कयू आर कोड घेऊन बसलेले आढळतात.) सरकारने हे ओळखले आहे.त्यामुळे व्यापारी थोडे पैसे वाचवण्यासाठी जर यु. पी. आय ला विरोध करणार असतील तर ते आपल्याच पायावर कुऱ्हाड मारुन घेत आहेत असे म्हणावे लागेल. सरकारला हे पूर्ण माहित आहे की डिजिटल व्यवहार सोडून जनता चलनी रोखीच्या व्यवहारांच्या मागे आता धावणार नाही. त्यामुळे सरश्रकारचा नोटा छपाईचा/वितरणाचा खर्च यापुढेही कमी होत जाणार आहे. विरोधक जरी सरकारची अक्कल काढत असले तरी सरकारला काही फरक पडणार नाही. टोल नाक्यावरील 'फास्ट टॅग ' प्रणालीला सुरवातीला असाच विरोध झाला होता. पण आता चित्र काय दिसते? टोल नाक्यावर वाया जाणाऱ्या वेळेत खूप बचत झाली आहे. यु. पी. आय. शुल्क सरकारसाठी 'पेनी वाईज पाऊंड फुलिश'ठरण्याच्या ऐवजी व्यापाऱ्यांसाठी ठरेल का याचा विचार त्यांनी करावा आणि मगच विरोध करावा.

– रघुनंदन भागवत

# सरकारी शाळांमध्ये सर्वसामान्य आणि शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळते - कल्याण नाना गायकवाड

## आमदार अनुराधाताई चव्हाण यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - आमदार अनुराधाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अनावश्यक खर्च टाळत सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला. त्याचाच एक भाग म्हणून पंचायत समिती सदस्य निर्मलाताई पळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पळशी येथील जिल्हा परिषद शाळा तसेच परिसरातील विद्यार्थी व नागरिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती सभापती कल्याण नाना गायकवाड, पंचायत समिती सदस्य सौ. निर्मला अंकुशराव पा. पळसकर, तसेच भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी अंकुशराव पा. पळसकर, गणेश पळसकर, आरोग्य अधिकार, कर्मचारी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

पंचायत समिती सभापती कल्याण नाना गायकवाड यावेळी बोलताना म्हणाले की, जिल्हा परिषद शाळांच्या दर्जाबाबत त्यांनी शाळांचे कौतुक केले. सरकारी शाळांमध्ये सर्वसामान्य आणि शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळते. त्यामुळे पालकांनी आणि गावातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी सरकारी शिक्षण संस्थांकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे आवाहन करण्यात आले.

सरकारी शाळांमध्ये शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जात असताना विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊ नये, यासाठी पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत जागरूक राहावे,





असे आवाहन पंचायत समिती सभापती कल्याण नाना गायकवाड यांनी केले.

**१०० दिवसांच्या आरोग्य मोहिमेची माहिती**

आरोग्य विभागाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू असलेल्या १०० दिवसांच्या आरोग्य मोहिमेची माहितीही यावेळी देण्यात आली. या मोहिमेदरम्यान आशा सेविका, गटप्रवर्तक, आरोग्य सेविका तसेच वैद्यकीय अधिकारी यांच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी केली जाणार आहे. तपासणीमध्ये गंभीर आजाराची लक्षणे आढळणाऱ्या नागरिकांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यासोबतच प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जनजागृती केली जाणार असल्याचे आरोग्य विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले. आमदार अनुराधाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या आरोग्य शिबिराला गावातील महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली. सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा केल्याबद्दल आयोजकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. फुलंब्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. अनुराधाताई अतुल चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र वडगाव काजी यांच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित या शिबिरात पळशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी तसेच पळशी, बकापूर, कान्हापूर, तांडा नं. १ व तांडा नं. २ येथील नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या आरोग्य शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यविषयक तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ मिळाला.

### सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा

कार्यकर्त्यांनी वाढदिवसानिमित्त मोठा किंवा खर्चिक कार्यक्रम न करता सामाजिक उपक्रम राबवून नागरिकांच्या सोयी सुविधांवर लक्ष केंद्रीत करून साजरा करावा. तसेच सध्याची दुष्काळी परिस्थिती पाहता शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक असल्याचेही आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी सांगितले होते. त्याच्याच आदेशाचे पालन करत पंचायत समिती सदस्य निर्मलाताई पळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पळशी येथील जिल्हा परिषद शाळा तसेच परिसरातील विद्यार्थी व नागरिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

बदलत्या हवामानामुळे लहान मुलांसह नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये, यासाठी आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. आवश्यक असलेल्या नागरिकांना वैद्यकीय उपचार व औषधोपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले, असे भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी अंकुशराव पळसकर यांनी सांगितले.

आमदार अनुराधाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या सामाजिक उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टी पळशी, बकापूर, कान्हापूर, तांडा नं. १ व तांडा नं. २ येथील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# मुंबईला जागतिक ज्ञान केंद्र बनविण्यात यूडब्ल्यूए महत्वपूर्ण भूमिका बजावेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) - मुंबईला जागतिक दर्जाचे ज्ञान, नवोपक्रम, तंत्रज्ञान आणि प्रतिभेचे केंद्र बनविण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या प्रयत्नांना युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (यूडब्ल्यूए) इंडिया, मुंबई कॅम्पसच्या उद्घाटनामुळे नवे बळ मिळणार आहे. जागतिक दर्जाच्या संस्था, पायाभूत सुविधा आणि प्रतिभावान मनुष्यबळ यांच्या माध्यमातून भविष्यातील उद्योग व संशोधन परिसंस्था उभारण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते यूडब्ल्यूए इंडिया, मुंबई कॅम्पसचे उद्घाटन झाले. यावेळी वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे प्रीमियर रॉजर कूक, यूडब्ल्यूएच्या चॅन्सलर डॉ. डायन स्मिथ-गँडर, कुलगुरू प्रा. अमित चकमा, विद्यापीठाचे पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, यूडब्ल्यूएसारख्या ऑस्ट्रेलियातील अग्रगण्य संशोधनाधिष्ठित विद्यापीठाने भारतातील आपला पहिला कॅम्पस मुंबईत स्थापन करण्याचा निर्णय घेतला, ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित 'ग्रुप ऑफ एट'मधील भारतात कॅम्पस सुरू करणारे यूडब्ल्यूए हे पहिले विद्यापीठ ठरले आहे. हा निर्णय आजच्या मुंबईची क्षमता आणि जागतिक स्तरावरील तिच्या वाढत्या महत्वाची साक्ष देणारा आहे. मुंबई ही देशाची आर्थिक, व्यावसायिक आणि मनोरंजनाची राजधानी असली तरी पुढील पिढीसाठी ती जागतिक ज्ञान आणि नवोपक्रम केंद्र बनविण्याचे राज्य शासनाचे ध्येय असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. यासाठी मुंबईलगत विकसित होत असलेल्या 'मुंबई ३.०' प्रकल्पात एज्युकेशन सिटी, मेडी-सिटी, इनोव्हेशन सिटी, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर इकोसिस्टम तसेच संशोधन व उद्योगविकासाची नवी केंद्रे उभारली जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मुळे भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले असून आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्यास नवे दालन खुले झाले आहे. पूर्वी भारतीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जावे लागत होते; आता जगातील नामांकित विद्यापीठे भारतात येत असून त्यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. यूडब्ल्यूए, मुंबई कॅम्पसमधील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शैक्षणिक वातावरणाबरोबरच देशातील प्रमुख वित्तीय संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या, तंत्रज्ञान उद्योग, स्टार्टअप्स, संशोधक आणि उद्योजकांच्या परिसंस्थेशी थेट जोडले जाण्याची संधी मिळेल, असे त्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, आरोग्य सेवा, क्रिटिकल मिनरल्स, स्वच्छ ऊर्जा, शाश्वत विकास आणि प्रगत उत्पादन तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये संयुक्त संशोधन आणि शैक्षणिक सहकार्य वाढावे, अशी अपेक्षाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

वेस्टर्न ऑस्ट्रेलियाकडे उत्कृष्ट क्षमता आणि महाराष्ट्राकडे व्यापक प्रमाणात प्रतिभा व संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे दोन्ही प्रदेशांमधील ज्ञानाधिष्ठित भागीदारी भारत-ऑस्ट्रेलिया संबंधांचा एक मजबूत स्तंभ ठरू शकते, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. यूडब्ल्यूए हे महाराष्ट्राच्या भविष्यदृष्टीतील विकासप्रवासाचे भागीदार बनले असून या भागीदारीच्या वृद्धीसाठी महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे प्रीमियर रॉजर कूक यांनी मुंबईतील यूडब्ल्यूए कॅम्पसचे उद्घाटन हे वेस्टर्न ऑस्ट्रेलिया आणि भारत, विशेषतः महाराष्ट्र यांच्यातील संबंधांमधील ऐतिहासिक मैलाचा दगड असल्याचे सांगितले. गेल्या ३० वर्षांपासून मुंबई ही वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या भारतातील सहभागाचे प्रमुख केंद्र राहिली असून, शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान, उद्योग आणि लोकसंपर्काच्या क्षेत्रात दोन्ही बाजूंमध्ये दृढ भागीदारी निर्माण झाली आहे, असे त्यांनी नमूद केले. यूडब्ल्यूएचा मुंबई कॅम्पस विद्यार्थ्यांसाठी जागतिक शिक्षण, संशोधन, उद्योग सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय करिअरच्या नव्या संधी उपलब्ध करून देईल, तसेच भारत आणि वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्यातील ज्ञान, नवोपक्रम आणि कौशल्य विकासावर आधारित सहकार्याला अधिक बळकटी देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चॅन्सलर डॉ. डायन स्मिथ-गँडर यांनी मुंबई आणि चेन्नई येथील कॅम्पससाठी सुमारे ८० दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर्सची गुंतवणूक करण्यात आली असून भारत-ऑस्ट्रेलिया संबंध अधिक दृढ करण्याच्या वचनबद्धतेचे हे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. उच्च शिक्षणातून ज्ञान, संधी आणि जागतिक स्तरावरील संलग्नता निर्माण करण्याच्या उद्देशाने यूडब्ल्यूए भारतातील नव्या पिढीच्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यूडब्ल्यूएच्या मुंबई कॅम्पससाठी गेल्या काही दिवसांपासून करण्यात आलेल्या पाठपुराव्याचा उल्लेख केला. विद्यापीठाने तीन भारतीय विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती जाहीर केल्याबद्दल स्वागत करताना, यामुळे विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी होणारा परकीय चलनाचा खर्च वाचण्यास म दत होईल, तसेच विद्यापीठाच्या संशोधनकेंद्री कार्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही लाभ होईल, असे त्यांनी सांगितले. राज्यातील विविध विद्यापीठांचे कॅम्पस 'एज्युकेशन सिटी'मध्ये उभारले जात असून, भविष्यात तेथे सुमारे एक लाख विद्यार्थी शिक्षण घेतील, अशी माहितीही त्यांनी दिली.

# रोजगार महाकुंभ - महाराष्ट्र २०२६ : युवकांच्या स्वप्नांना रोजगाराची नवी दिशा ; एकाच दिवशी राज्यभर संधींचा महाकुंभ..!

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, युवा शक्ती ही राष्ट्र शक्तीङ्ग या विचाराला केंद्रस्थानी ठेवत महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत राज्यातील युवक-युवतींसाठी रोजगाराच्या संधींचे व्यापक दालन खुले करण्यात येत आहे. दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ - महाराष्ट्र या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून, राज्यभरातील युवकांना त्यांच्या कौशल्याला अनुरूप रोजगाराच्या संधी स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

रोजगाराच्या शोधात असलेल्या युवकांसमोर अनेकदा योग्य संधी, योग्य रोजगारदाता आणि योग्य कौशल्य यांचा मेळ घालण्याचे आव्हान असते. दुसरीकडे उद्योग-व्यवसाय क्षेत्रालाही आवश्यक कौशल्य असलेले मनुष्यबळ शोधताना अडचणी येतात. याच रोजगारदाता आणि रोजगार इच्छुक यांच्यातील दरी कमी करण्यासाठी रोजगार महाकुंभाची संकल्पना आकाराला आली आहे. एकाच दिवशी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करून रोजगाराची संधी युवकांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे.

या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे राज्यभर १००० ठिकाणी एकाच दिवशी रोजगार मेळावे आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. औद्योगिक आस्थापना, MS>ME, उद्योग संघटना, महाविद्यालये, विद्यापीठे, कौशल्य विद्यापीठे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI), पॉलिटेक्निक तसेच विविध संस्थांच्या सहकार्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

१००० रोजगार मेळावे, एकाच दिवशी हा केवळ विक्रमी आकडा नसून, महाराष्ट्रातील युवकांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन, उद्योग आणि कौशल्य यंत्रणा यांना एकत्र आणणारा व्यापक उपक्रम आहेङ्ग. राज्याच्या प्रत्येक भागातील युवकांना रोजगाराच्या संधींच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे, उद्योगांच्या मनुष्यबळाच्या गरजा पूर्ण करणे आणि रोजगारासाठी आवश्यक कौशल्यांना प्रत्यक्ष संधीशी जोडणे, ही या उपक्रमामागील प्रमुख संकल्पना आहे.

या उपक्रमाला उद्योग क्षेत्राकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, उपलब्ध माहितीनुसार राज्यभर १,०८० रोजगारदात्यांनी नोंदणी केली असून त्यांच्याकडून ६०,६५७ रिक्तपदे उपलब्ध झाली आहेत. त्याचबरोबर ५७,६४८ रोजगार इच्छुक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे रोजगार महाकुंभ हा केवळ एक दिवसाचा रोजगार मेळावा न राहता, मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी आणि उमेदवार यांना जोडणारा राज्यव्यापी उपक्रम ठरण्याची क्षमता बाळगतो.

या महाकुंभाची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे रोजगारासाठी उमेदवाराची तयारी. रोजगार मेळाव्यापूर्वी उमेदवारांना पूर्व-रोजगार प्रशिक्षण देण्यात येत आहे. करिअरविषयक मार्गदर्शन, स्वतःची ओळख प्रभावीपणे करून देणे, मुलाखत व मॉक इंटरव्ह्यू, व्यक्तिमत्त्व विकास व ग्रूमिंग, कार्यस्थळावरील कौशल्ये, संवाद कौशल्ये तसेच संबंधित क्षेत्रातील रोजगारासाठी आवश्यक तयारी अशा विविध बाबींवर प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष सरावाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

म्हणजेच रोजगार महाकुंभाची वाटचाल नोंदणी कौशल्य व मुलाखत तयारी रोजगार मेळावा निवड प्रत्यक्ष नियुक्तीङ्ग अशा सर्वसमावेशक प्रक्रियेतून होत आहे. उमेदवाराला केवळ नोकरीची माहिती देणे हा या उपक्रमाचा उद्देश नसून, त्याला मुलाखतीसाठी सक्षम करणे आणि योग्य रोजगाराशी जोडणे हा त्यामागील व्यापक दृष्टिकोन आहे.

विशेष म्हणजे रोजगार मेळाव्यानंतरही प्रक्रिया थांबणार नाही. उमेदवारांच्या निवडीचा आणि प्रत्यक्ष नियुक्तीचा मागोवा घेण्यासाठी Post-Drive Tracking ची व्यवस्था करण्यात आली आहे. प्राथमिक निवडीनंतर प्रत्यक्ष नियुक्तीमध्ये रूपांतर व्हावे, यासाठी पुढील कालावधीत पाठपुरावा व आढावा घेण्याची यंत्रणा ठेवण्यात आली आहे. त्यामुळे रोजगार महाकुंभाचा भर केवळ उपस्थिती आणि निवडीच्या आकडेवारीवर नसून प्रत्यक्ष रोजगारनिर्मितीच्या परिणामावर राहणार आहे. आजच्या स्पर्धात्मक रोजगार बाजारात शिक्षणसोबत कौशल्य, आत्म विश्वास, संवादकौशल्य आणि मुलाखतीची तयारी तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे दहावी-बारावीपासून पदवी, पदव्युत्तर, ITI, डिप्लोमा आणि अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या विविध शैक्षणिक पार्श्वभूमीच्या युवकांसाठी रोजगाराच्या संधी शोधण्याची ही महत्त्वाची संधी आहे.

**सांगली जिल्ह्यात १६ ठिकाणी रोजगाराच्या संधी -**

रोजगार महाकुंभ - महाराष्ट्र २०२६ अंतर्गत सांगली जिल्ह्यातही व्यापक नियोजन करण्यात आले असून, जिल्ह्यातील १६ ठिकाणी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील विविध भागांतील युवकांना त्यांच्या परिसरातच नामांकित उद्योग व आस्थापनांमधील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या रोजगार महाकुंभाची तयारी म्हणून सध्या जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (ITI) क्षेत्रनिहाय रोजगारक्षम प्रशिक्षण सुरू आहे. उमेदवारांच्या गरजा आणि उपलब्ध रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विविध क्षेत्रांशी संबंधित प्रशिक्षण, मुलाखतीची तयारी, स्वयं-परिचय, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास तसेच रोजगारासाठी आवश्यक कौशल्यांवर भर दिला जात आहे. त्यामुळे रोजगार मेळाव्याला येणारा उमेदवार केवळ नोकरीच्या शोधात नसून, नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक तयारी करूनच रोजगारदात्यांसमोर आत्म विश्वासाने उभा राहणार आहे.

**रोजगार महाकुंभ** - महाराष्ट्र २०२६ हा केवळ रोजगार मेळावा नसून युवकांच्या आकांक्षा, उद्योगांच्या गरजा आणि शासनाच्या कौशल्य विकासाच्या प्रयत्नांना एका व्यासपीठावर आणणारा व्यापक उपक्रम आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील युवकांनी या संधीचा लाभ घेत स्वतःची नोंदणी करावी, पूर्व-रोजगार प्रशिक्षणात सहभागी व्हावे आणि आपल्या कौशल्याला अनुरूप रोजगाराच्या संधींचा शोध घ्यावा. २९ सप्टेंबर २०२६ हा दिवस महाराष्ट्रातील हजारो युवकांसाठी नोकरीच्या शोधाचा दिवस न राहता नव्या करिअरची सुरुवात करण्याचा दिवस ठरावा, हीच रोजगार महाकुंभामागील खरी अपेक्षा आहे. संधी मोठी आहे-व्यासपीठ राज्यव्यापी आहे- आता गरज आहे ती युवकांनी एक पाऊल पुढे टाकण्याची!

# वर्षा निवासस्थानी विविध देशांच्या महा वाणिज्यदूतांनी घेतले श्री गणेशाचे दर्शन



मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) - वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विविध देशांच्या महावाणिज्यदूतांनी श्री गणेशाचे दर्शन घेतले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सर्व महा वाणिज्यदूतांचे स्वागत करून त्यांच्यासमवेत श्री. गणेशाची पूजा केली.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थित महा वाणिज्यदूतांशी संवाद साधला. गणेशोत्सवाच्या उत्साही आणि मंगलमय वातावरणात झालेल्या या भेटीत विविध विषयांवर सौहार्दपूर्ण चर्चा झाली. महावाणिज्यदूतांनीही श्री गणेशाचे दर्शन घेत महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा अनुभव घेतला.

महावाणिज्य दुतांमध्ये जपान येथील हितोमी सातो, व्हिएतनामचे ले क्कांग बिएन, दक्षिण कोरियाचे डोंगवान यू, युएइचे अब्दुल्ला हुसेन अलम झुंकी, ओमान देशाचे महबूब अल रईसी, इटलीच्या वॉल्टर फेरारा, तुर्कीयेचे मुस्तफा केमालेत्तिन एरुयगुर, येमेन देशाचे मोहम्मद ताहेर अब्दुलमोघ्नी, कतारच्या अहमद साद अल-सुलैती, थायलंडचे सिरीपोर्न सुपानी मत्विसेटकुल, फ्रान्सचे पॅट्रिक लेव्हेरीनो, पोलंड देशाचे तोमाश व्हिएल्गोमास, जर्मनीच्या ख्रिस्टॉफ हॅलियर, युक्रेनचे मिस ॲना झायचेन्को, आयर्लंड देशाचे पैट्रिक डफी, ब्राझीलचे रेल्सा पेलुती अलेंकार, इजिप्त देशाचे डालिया तवाकोल, चीन देशाच्या चिन जी, नेदरलँडचे नाबिल ताउती, इराणचे सईद रझा मोसायेब मोत्लाघ, स्वीडनचे स्वेन ऑस्टबर्ग, नॉर्वे येथील मॉनिका नागेलगार्ड, श्रीलंकेच्या शिरानी अरियाराथ्ने, मलेशियाच्या नजवा मुस्यरीफाह रामली, इराकचे जुहैर साद अब्बास, बेल्जियमचे पियरे स्टीव्हर्लिंक यांचा समावेश होता.

बांग्लादेशाच्या उप उच्चायुक्त फरहाना अहमद चौधरी, ब्रिटनच्या उप उच्चायुक्त कमलजीत कांग यांच्यासह अमेरिकेच्या उप महावाणिज्यदूत एरिन युसेन यांची उपस्थिती होती. तसेच फिनलंड येथील उप महावाणिज्यदूत जोन्ना सुनि उपस्थित होते. याप्रसंगी मुख्य राज्य शिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, अमृता फडणवीस आदी उपस्थित होते.

# मंगेश पाडगावकरांच्या उभादांडा गावाला साहित्य पर्यटनाचे नवे रूप देणार

सिंधुदुर्ग, दि. १९ (प्रतिनिधी) - कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या साहित्यिक स्मृतींशी जोडलेल्या उभादांडा येथील 'कवितांचे गाव' उपक्रमाला नावाला साजेसे दिमाखदार स्वरूप देण्यात येणार असून, येत्या दोन महिन्यांत विकासकाम ांना गती देण्यात येईल. यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही मराठी भाषा मंत्री तथा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. उभादांडा येथील 'कवितांचे गाव'ची पाहणी केल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

'कवितांचे गाव' अधिक प्रभावी करण्यासाठी मंगेश पाडगावकर यांनी शिक्षण घेतलेल्या शाळेचे, शून्य पटसंख्या असलेल्या शाळेचे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या दालनाचे तसेच त्यांनी भेट दिलेल्या दालनाचे, अशा महत्त्वाच्या पाच दालनांना प्राधान्याने विकसित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यासंदर्भात मंत्री सामंत यांनी भाषा संचालकांना दूरध्वनीद्वारे सूचना दिल्या. भाषा संचालक उद्या उभादांडा येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करणार असून त्यानंतर प्रभावी नियोजन आराखडा तयार करण्यात येणार आहे.

उभादांड्याच्या विकासासाठी गावातील अंतर्गत वाद बाजूला ठेवून कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या साहित्यिक वारशाचा विचार करावा, असे आवाहन मंत्री सामंत यांनी केले. गावातील नागरिकांना त्रास होईल, अशी कोणतीही व्यवस्था नको. गावात प्रवेश केल्यानंतर 'हे कवितांचे गाव आहे' याची अनुभूती प्रत्येकाला यावी, यासाठी सर्व फलक, दिशादर्शक आणि परिसराचे सुशोभीकरण दर्जेदार पद्धतीने करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

'पुस्तकांचे गाव' भिलारच्या धर्तीवर उभादांडा येथे साहित्य पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक दालनाची स्वतंत्र संकल्पना निश्चित करून त्याच्या संचालनासाठी प्रमाणित कार्यपद्धती (SOP) तयार करण्यात येईल. दालनात उपलब्ध साहित्य कसे पाहता येईल, पर्यटकांना कोणती माहिती द्यायची, दालनाची देखभाल व व्यवस्थापन कसे करायचे, याबाबतची कार्यपद्धती निश्चित करण्याचे निर्देशही मंत्री सामंत यांनी दिले.

उभादांडा येथे मंगेश पाडगावकर यांच्या नावाने दर्जेदार ग्रंथालय उभारण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे मंत्री सामंत यांनी सांगितले. 'कवितांचे गाव' हा केवळ पर्यटनाचा उपक्रम नसून सामाजिक आणि साहित्यिक वारसा जपणारे काम आहे. त्यामुळे प्रशासन, स्थानिक नागरिक आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून दोन महिन्यांत उभादांड्याला नावाला शोभेल असे दिमाखदार स्वरूप द्यावे. या कामासाठी गटविकास अधिकारी हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, तहसीलदार ओंकार ओतरी, गटविकास अधिकारी यांच्यासह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# धर्मादाय आयुक्त कार्यालयातर्फे मध्यवर्ती कारागृहाला वैद्यकीय उपकरणांचे दान; राज्यातील पहिलाच उपक्रम

## बंदीजनांच्या कौशल्य विकासासाठी उपक्रम राबवावे- न्या.नितीन सूर्यवंशी

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - बंदीजनांच्या शारिरीक आरोग्यासोबतच त्यांचे मानसिक आरोग्य व कौशल्य विकासासाठी कारागृह प्रशासनाने उपक्रम राबवावे.जेणेकरुन ते कुशल आणि सकारात्मक व्यक्ती म्हणून समाजात परत गेले पाहिजे,असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांनी आज केले.

येथील धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाने मध्यवर्ती कारागृहातील बंदीजनांच्या आरोग्य सेवेसाठी पुढाकार घेत बंदीजनांच्या विविध आरोग्य चाचण्यांसाठी लागणारे वैद्यकीय उपकरणे आज मध्यवर्ती कारागृहाला दान करण्यात आले. यानिमित्त बंदीजनांसाठी आरोग्य तपासणी व निदान शिबिरही आयोजीत करण्यात आले. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयाचा 'लोकसंवाद' या सहयोगी उपक्रमात 'श्री गणेशा आरोग्याचा' हा उपक्रमही पार पडला.

न्या. नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला. धर्मादाय सह आयुक्त नितीन जाधव, धर्मादाय उपायुक्त उषा चव्हाण-पाटील, सहा. धर्मादाय आयुक्त प्रभू कापडे, मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक अनिल खामकर, मराठवाडा धर्मादाय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. चंद्रकांत वरुडीकर, खंडपीठाचे प्रबंधक उमाकांत देशमुख, राजेश सासने, अच्च्युत कराड तसेच सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी,




वैद्यकीय पथक आदी उपस्थित होते.

न्या. सूर्यवंशी आपल्या संबोधनात म्हणाले की, बंदीजनांच्या आरोग्यासाठी एखाद्या कारागृहाला इतक्या मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय उपकरणे आणि सहसाहित्य देण्याचा हा राज्यातील पहिलाच उपक्रम असावा. या सुविधांमुळे कारागृह प्रशासनाला बंदीजनांना वैद्यकीय सुविधा व उपचार उपलब्ध करुन देणे सोईस्कर होईल. बंदीजन हे शिक्षा भोगत असले तरी त्यांचे मानवी हक्क, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा मुलभूत अधिकार अबाधित आहेत. त्याचे रक्षण करणे हे समाजाचे आणि कायदा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचेही कर्तव्य आहे.

**'लोकसंवाद' उपक्रमात 'श्रीगणेशा आरोग्याचा'**

न्या. सूर्यवंशी पुढे म्हणाले की, कारागृह प्रशासनाने बंदीजनांच्या शारिरीक आरोग्याची काळजी घेतांनाच त्यांचे मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठीही उपक्रम राबवावे.त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यातील कौशल्यांचा विकास करावा. जेणे करुन शिक्षा कालावधी पूर्ण केल्यानंतर ना ते एक कुशल आणि सकारात्मक व्यक्ती म्हणून समाजात परततील.

न्या. सूर्यवंशी यांनी बंदीजनांना उद्देशून सांगितले की, एखाद्या चुकीमुळे आपण गुन्हेगार ठरले असलात तरी चुक सुधारण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आणि संधी आहे. भूतकाळातील चुका सुधारुन आजच्या प्रयत्नांनी आपले भविष्य घडवावे. प्रास्ताविक कारागृह अधीक्षक अनिल खामकर यांनी केले. धर्मादाय सह आयुक्त नितीन जाधव यांनीही आपले म नोगत व्यक्त केले.आरोग्य सुविधा तसेच धर्मादाय म्हणून राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची सेवा ही तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**सहभागी संस्था आणि आरोग्य सेवा-** आजच्या या उपक्रमात महात्मा गांधी मिशन रुग्णालय, सेठ नंदलाल धूत रुग्णालय, डॉक्टर हेडगेवार रुग्णालय, एम.आय.टी. रुग्णालय, एम.एम.आर. आय. कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद चिकलठाणा लायन्स आय हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट, बी.एस. पी. मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, इंडीयन मेडीकल असोसिएशन या संस्थांनी या उपक्रमात सहयोग दिला. यावेळी आयोजीत आरोग्य तपासणी शिबिरात हृदयरोग तपासणी, कर्करोग निदान, कान नाक घसा आणि डोळे तपासणी, महिलां करीता कॅन्सर विषयक पॅप स्मीअर तपासणी, मूळव्याध, त्वचारोग तपासणी, डोळ्यांकरीता मोतीबिंदू तपासणी, मोफत चष्मे वाटप, रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, हाडांची तपासणी, सी.पी.आर. चाचण्या करण्यात आल्या.

ग्लोबल फाऊंडेशन, सेंट लॉरेन्स एज्युकेशन ट्रस्ट, मानव विकास कल्याण प्रतिष्ठान, परिपूर्ती मेडीकल फाऊंडेशन,इंडियन इन्स्टिट्युट फॉर रुरल डेव्हलपमेंट, भाऊराया फाऊंडेशन, फैज ए आम ट्रस्ट अशा विविध धर्मादाय संस्थांनी विविध वैद्यकीय उपकरणे व सहसाहित्याचे दान केले. या सर्व संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.

# उत्तम आर्जव धर्म जैन गुरुकुलात उत्साहात साजरा; तत्त्वार्थसूत्र महामंडल विधान पूजनात भाविकांची उपस्थिती



छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - दशलक्षण महापर्वाच्या पावन पर्वात श्री वेरूळ पार्श्वनाथ ब्रह्मचर्य आश्रम जैन गुरुकुलात भक्ती आणि उत्साहाचे सुंदर वातावरण पाहायला मिळाले. दशलक्षण पर्वातील 'उत्तम आर्जव धर्म' या पवित्र दिवसानिमित्त आचार्य श्री १०८ विद्यासागरजी महामुनिराज तसेच वर्तमान आचार्य श्री १०८ समयसागरजी महाराज यांचे परम प्रभावक शिष्य, निर्यापक श्रमण मुनिश्री १०८ नियमसागरजी गुरुदेव संघस्थ मुनिश्री १०८ सुपार्श्वसागरजी महाराज यांच्या प्रवचनाचा धर्मलाभ उपस्थित भाविकांनी घेतला.

यानंतर गुरुकुलाच्या प्रांगणात 'तत्त्वार्थसूत्र महामंडल विधान पूजन' या भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रतिष्ठाचार्य बाल ब्रह्मचारी मनीष भैयाजी (बंडा, मध्य प्रदेश) यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक अनुष्ठान सोहळा संपन्न झाला.

या धार्मिक अनुष्ठानात सकल दिगंबर जैन समाज, एलोरा येथील श्रावक-श्राविका तसेच जैन गुरुकुलातील सर्व विद्यार्थ्यांनी म ोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहाने सहभाग घेतला.

**सौधर्म इंद्र होण्याचा मान -** विधान पूजनाच्या वेळी समाजातील अनेक मान्यवरांना सौधर्म इंद्र होण्याचा पवित्र आणि मंगलमय मान मिळाला. यावेळी संस्था अध्यक्ष दिनेश गंगवाल व सौ. रेखाजी गंगवाल, संस्था महामंत्री डॉ. प्रेमचंद पाटणी व डॉ. सौ. सरलाजी पाटणी, सौ. प्रमिलाबाई शांतिलाल अजमेरा, सौ. सुनीता मुकेशकुमार जैन, सौ. प्रीती कमलेश काला, बालाजी सीताराम उखळकर, संजय जैन, नीता आशीष कान्हेड, शांतिधारा व अभिषेक, विधान पूजनादरम्यान जिनेंद्र भगवानांची मंगल शांतिधारा (अभिषेक) करण्याचा पवित्र मान सौ. मीना नरेंद्र गंगवाल (छत्रपती संभाजीनगर, सपरिवार) तसेच सौ. अंशूसागर पाटणी व कु. आरव (छत्रपती संभाजीनगर, सपरिवार) यांच्या हस्ते संपन्न झाला. मंत्रोच्चार, भक्तिगीते आणि जिनभक्तीमुळे संपूर्ण गुरुकुल परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

# पिंपळे सौदागर येथे गणपती अथर्वशीर्ष पठण उत्साहात



पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) - पिंपळे सौदागर येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते , नगरसेवक (अजित पवार गट ) विठ्ठल नाना काटे, प्लेस्कोचे संचालक युवानेते उमेश काटे यांच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित अथर्वशीर्ष पठणाच्या कार्यक्रमात परिसरातील नागरिकांनी सहभागी होत श्रीगणेश चरणी सेवा अर्पण केली. आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या सहकार्याने घेण्यात आलेला हा अध्यात्मिक कार्यक्रम बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर मोठ्या भावभक्तीपूर्ण वातावरणात झाला. प्रारंभी विठ्ठल नाना काटे, उमेश काटे, विलास काटे, नंदकुमार काटे, अनील काटे, मीनाक्षी काटे, विलास जोशी शंकरराव काटे, शशी काटे, ज्ञानेश्वर घोटणे, दत्ता झिंजुर्डे, सुनीलअण्णा काटे, आदींच्या हस्ते दिपप्रज्वलन आणि श्री गणेशाच्या आरतीने करण्यात आला. त्यानंतर मकरंद वळे , रेणुका सुरपूरकर यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित नागरिकांनी अथर्वशीर्षाचे पठण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मकरंद वळे यांनी करुन प्रारंभी अथर्वशीर्ष आणि फलश्रुती बद्दल माहिती दिली.

# गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा जागतिक पटलावर नेण्यासाठी दस्तऐवजीकरण करा

## विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाची सांस्कृतिक समृद्धी व वैशिष्ट्ये जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी व्यापक डिजिटल दस्तऐवजीकरण करण्यात येत आहे. नागरिक, गणेश मंडळे आणि संबंधित यंत्रणांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले.

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला असून, युनेस्कोचा वारसा दर्जा व अन्य जागतिक मानांकने मिळिवण्याच्या दृष्टीने ही मोहीम राबविण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील पुरातत्व संचालनालयामार्फत 'बाप्पा डॉट ओआरजी' या संकेतस्थळाच्या माध्यमातून हे दस्तऐवजीकरण करण्यात येत आहे.

या संकेतस्थळावर घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सवातील पूजा, सजावट, गणेशमूर्ती, खाद्यपरंपरा, लोककला, सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम तसेच सांस्कृतिक वैशिष्ट्यांची छायाचित्रे व व्हिडिओ नागरिकांना अपलोड करता येणार आहेत. राज्यातील ३५ हून अधिक ऐतिहासिक शहरांसह देशभरातील गणेशोत्सवाशी संबंधित परंपरांची माहितीही संकलित केली जाणार आहे. सहभाग नोंदविणाऱ्या नागरिकांना 'डिजिटल सांस्कृतिक संवर्धक' प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

गणेशोत्सव काळातील कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन, सार्वजनिक सुरक्षा, महिला व बालसुरक्षा, सामाजिक सलोखा, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, रक्तदान व व्यसनमुक्ती यांसारख्या समाजोपयोगी उपक्रमांचेही दस्तऐवजीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पोलीस यंत्रणेने समाजमाध्यमांतून या उपक्रमाचा प्रचार करावा तसेच वाहतूक नियंत्रण कक्ष, महत्त्वाची ठिकाणे आणि गणेश मंडळांजवळ 'बाप्पा डॉट ओआरजी'चा क्यूआर कोड उपलब्ध करून द्यावा.

गणेश मंडळांनीही नागरिकांना या उपक्रमात सहभागी करून घ्यावे. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा नागरिकांशी सकारात्मक संवाद, सामाजिक उपक्रम आणि सांस्कृतिक सहभाग यांचे छायाचित्रण व व्हिडिओ संकलित करून संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावेत. या उपक्रमासाठी ईफ्लॅग संस्थेचे तांत्रिक सहकार्य घेण्यात येत आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाच्या सूचनेनुसार छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्हाधिकारी व महानगरपालिका प्रशासनाने नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करून उपक्रमाचा नियमित आढावा घ्यावा. महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाची सुरक्षित, शिस्तबद्ध, सामाजिकदृष्ट्या सकारात्मक आणि सर्वसमावेशक प्रतिमा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. माहिती व जनसंपर्क विभागाच्या माध्यम ातून गणेशोत्सवात शासकीय योजनांच्या व्यापक प्रचार - प्रसारासाठी 'लोकसंवाद' हा उल्लेखनीय उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमास सर्व शासकीय विभागातील अधिकाऱ्यांनी सहयोग करून उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग घ्यावा, असे आवाहनही विभागीय आयुक्तांनी केले आहे.

# भरती परीक्षा सुधारणा : उच्चस्तरीय समिती सोमवारी (दि.२१) छत्रपती संभाजीनगरला

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - राज्यातील शासकीय भरती परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी गठित उच्चस्तरीय समिती सोमवार, दि. २१ रोजी जिल्ह्यात येत आहे. सोम वार दि.२१ रोजी सकाळी साडेदहा वा. छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात समिती विद्यार्थी, परीक्षार्थी व संबंधित घटकांना भेटून त्यांची मते जाणून घेणार आहे.सहभागाचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी आवश्यक सुधारणा, तसेच परीक्षा प्रक्रियेतील अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत राज्यशासनाने गठीत केलेल्या भरती परीक्षा सुधारणांसाठी नेमलेली उच्चस्तरीय समिती सोमवार दि.२१ रोजी जिल्ह्यात दाखल होत आहे. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारे परिक्षार्थी, अभ्यासिका चालक-मालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच परीक्षा पद्धतीबाबत सूचना मांडू इच्छिणाऱ्या नागरिकांना समिती भेटून चर्चा करणार आहे. त्यासाठी स्मार्ट सिटी कार्यालयात सकाळी साडेदहा वा. पासून समिती उपस्थित राहणार आहे. सर्व संबंधित घटकांनी उपस्थित रहावे,असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# भरती परीक्षा सुधारणांवर उच्चस्तरीय समितीशी संवाद ! विद्यार्थी, उमेदवार व संबंधित घटकांनी उपस्थित राहावे

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - राज्यातील भरती परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्यासाठी गठित राज्य भरती परीक्षा सुधारणा उच्चस्तरीय समिती सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर विभागाच्या दौऱ्यावर येत आहे.

यावेळी सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्था, कोचिंग सेंटर व हितसंबंधित घटकांशी संवाद होणार आहे. त्यानंतर दुपारी १ ते १.३० या वेळेत पत्रकार परिषद, तर दुपारी २.३० नंतर जिल्हास्तरीय उमेदवार व इतर भागधारकांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधण्यात येणार आहे. भरती परीक्षा पद्धतीबाबत अनुभव व सूचना मांडू इच्छिणाऱ्या संबंधितांनी या संवादात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वसुधैव कुटुंबकम्' हाच आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा पाया

## 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय' परिसंवादातील सर्वच तज्ज्ञ परीसंवादकांचा सूर

नाशिक, दि. १९ (प्रतिनिधी) दि. १५ सप्टेंबर रोजी जगभर साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडिओवर 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय' या विषयावर ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे आयोजित हे २४ वे ज्ञानसत्र दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाले. परिसंवादातील तज्ज्ञांनी 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा म हत्त्वपूर्ण पाया असल्याचे प्रतिपादन केले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार या ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुम ार पाईकराव यांनी ज्ञानसत्राचे सम न्वयन, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.



परिसंवादात लोकशाहीची जागतिक संकल्पना, दक्षिण आशियातील लोकशाहीची वाटचाल, विविधता, नागरिकांचा सहभाग, विरोधी पक्षांची भूमि का तसेच लोकशाहीसमोरील समकालीन आव्हाने यांवर चर्चा करण्यात आली. लोकशाही ही केवळ निवडणूक प्रक्रिया नसून समानता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, संवाद, सहअस्तित्व आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित व्यापक व्यवस्था असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. प्रथम परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी 'लोकशाहीची दक्षिण आशियाई जडणघडण : सार्क देशांची वाटचाल, विविधता आणि आव्हाने तसेच विरोधी पक्षांची भूमिका' या विषयावर विचार म ांडले. दक्षिण आशियातील विविध देशांतील लोकशाही संस्थांची वाटचाल, सामाजिक-सांस्कृतिक विविधता, नागरिकांचा सहभाग आणि विरोधी पक्षांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

द्वितीय परिसंवादक प्रा. सुजाता मोरे यांनी 'भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता' या विषयावर सविस्तर विवेचन केले. लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग, सार्वजनिक प्रश्नांविषयीची जागरूकता आणि नागरिकांच्या जबाबदाऱ्यांचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. पर्यटनशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक सहभागाच्या विविध पैलूंवरही त्यांनी प्रकाश टाकला. तिसरे परिसंवादक प्रा. विजयकुम ार पाईकराव यांनी 'अमेरिकन व भारतीय लोकशाहीचा तुलनात्मक आढावा' घेताना दोन्ही देशांच्या लोकशाही व्यवस्थांची वैशिष्ट्ये आणि संस्थात्मक रचनेचे विवेचन केले. यानंतर त्यांनी 'पालक लोकशाहीचे' हे समयोचित काव्य सादर केले. या ज्ञानसत्राचा लाभ अध्ययनार्थी, शिक्षक, संशोधक आणि नागरिकांना घेता यावा, यासाठी कार्यक्रम विद्यापीठाच्या https://avc.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यापीठाच्या दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख श्री. धनंजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक श्री. प्रकाश सापनर व श्री. गिरीश गवळी यांनी तांत्रिक सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. दीपक राजगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या ज्ञानसत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनप्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले आहे.

# लोकसंवाद उपक्रम : श्री विघ्नहर्ता गणेश मंडळ येथे पोस्टाच्या विविध योजनांची माहिती

## बचत, विमा व गुंतवणूक योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन




छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - जिल्हा माहिती कार्यालयाच्या लोकसंवाद उपक्रम ाचा भाग म्हणून सिडको कॉलनी येथील श्री विघ्नहर्ता गणेश मंडळात भारतीय डाक विभागाच्या वतीने 'नाईट कॅम्प' आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून गणेशभक्तांना पोस्ट ऑफिसच्या विविध बचत, विमा तसेच आर्थिक योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

कॅम्पमध्ये उपस्थित नागरिकांना पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक खाते, रिकरिंग डिपॉझिट , टाइम डिपॉझिट , सुकन्या समृद्धी योजना, पोस्टल लाइफ इन्शुरन्स आणि रुरल पोस्टल लाइफ इन्शुरन्स यांसह पोस्ट विभागाच्या विविध सेवांची माहिती देण्यात आली. या योजनांचे स्वरूप व त्यांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रियेबाबतही नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

गणेशोत्सवात मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असल्याने त्यांच्यापर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्याच्या उद्देशाने हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. उपस्थित गणेशभक्तांना आपल्या नजीकच्या पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन आवश्यकतेनुसार खाते उघडून विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या यशस्वी आयोजनासाठी भारतीय डाक विभागाच्या दक्षिण उपविभागाचे व्ही. डी. पिटेकर यांच्या मार्गदर्शनात सतीश खांडे, गाडेकर तसेच सरडकर मास्टर यांनी विशेष परिश्रम घेतले.

पान १ वरून **दुष्काळ बैठक : नेत्यांसाठी काजू-बदामांची मेजवानी**

ज्याठिकाणी विहीराला पाणी आहे तिथली पिकं वाचवता येतील. दुष्काळी उपाययोजना करुन शेतकऱ्यांना किमान काहीतरी दिलासा देण्याचा प्रयत्न करु, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. विरोधकांना माहिती आहे, हे सगळे जे जीआर आहेत दुष्काळाचे, त्याप्रमाणे काय करायचे आहे, त्याचे नियम आहेत. तरच एनडीआरएफचे पैसे मिळतात. पण आपण न थांबता राज्य सरकारकडून मदत करतो, त्यानंतर एनडीआरएफचे पैसे क्लेम करतो. विरोधकांना प्रत्येक गोष्टीचं राजकारण करण्याची वाईट सवय लागली आहे. पण केवळ राजकारणं करणे योग्य नाही. जिथे विहिरींना पाणी आहे, तिथे रबी पिकांचे नियोजन करता येईल. अजून ठरवलं नाही, पण शक्यतो काही भाग जो प्रचंड कोरडा आहे. यावेळी सुदैवाने मोठ्या धरणांमध्ये चांगलं पाणी आहे, पण मराठवाड्यातील छोटी धरणं पाणी कमी आहे, म्हणून अशा भागात पिण्याच्या पाण्याचं संकट निर्माण होऊ नये, पाणी राखून ठेवावे लागते, मोठ्या धरणातही पाणी राखून ठेवलं आहे.

पान १ वरून

## पावसाचं कमबॅक!

आहे. बंगालच्या उपसागरात हवामानातील बदलामुळे गारवा निर्माण झालाय. मात्र, जिल्ह्यात जोरदार पावसाची प्रतीक्षा मात्र कायम आहे. बंगालच्या उपसागरात हवामानातील बदलामुळे महाराष्ट्रात पावसाचे पुनरागमन होत आहे. येत्या २० ते २५ सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्र आणि गोवा परिसरामध्ये पावसात मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांना दिलासा मिळणार असून, अंतर्गत भागातही पावसाचा जोर वाढणार आहे, असे ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे. तर येत्या १९ ते २२ सप्टेंबरदरम्यान सांगली, सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यांत मध्यम मुसळधार पावसाचा अंदाज आहे. ते २१ सप्टेंबरला नाशिकमध्येही मध्यम पाऊस पडेल. अहिल्यानगर, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांत मध्यम पावसाची शक्यता आहे. २२ सप्टेंबरला मराठवाड्यातही पाऊस राहील. २१ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहेत. हा मान्सूनच्या हंगामाचा शेवटचा टप्पा असून, या पावसामुळे कोरड्या हवामानातून दिलासा मिळू शकतो. बळीराजाला यामुळे काहीसा दिलासा मिळणार आहे.

## सहकार मंत्र्याला दणका

अखेर मुदत संपण्यापूर्वीच रिझर्व्ह बँकेने थेट कारवाईचा बडगा उगारत बाबासाहेब पाटील यांना संचालक पदावरून दूर करण्याचे निर्देश दिले आहेत. मी कोर्टात जाणार' - बाबासाहेब पाटील- दरम्यान, रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयावर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. '२०२१ साली संचालकांना १० वर्षे पदाबाबत जो कायदा संमत करण्यात आला आहे, तो आम्हाला लागू होतो. त्यामुळे आम्ही बडतर्फ होऊ शकत नाही. आरबीआयचा हा निर्णय अयोग्य असून मी बँकेचा संचालक म्हणून या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देणार आहे,' अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

**सहकार वतुर्ळात खळबळ** - सहकार मंत्र्यांनीच सहकार क्षेत्रातील नियमांची पायमल्ली केल्याचा आरोप होत असताना, आरबीआयच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील राजकीय आणि सहकार वतुर्ळात खळबळ उडाली आहे.

## ट्रम्पकडून १०० टक्के...

अंदाजे १.६ ते २ दशलक्ष बॅरलपर्यंत वाढला. आता, भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ४० टक्क्यांपेक्षा जास्त तेल रशियाकडून आयात करतो. यामुळे भारत रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या सर्वात मोठ्या देशांपैकी एक बनला आहे.

**रशियाच्या संरक्षण क्षेत्रावरही निर्बंध**

या विधेयकाला 'लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट ऑफ २०२६' असे म्हटले जाते. या विधेयकात रशियाच्या तेल आणि संरक्षण-संबंधित व्यवसायांवर कठोर निर्बंध लादण्याची तरतूद आहे. विद्यमान निर्बंधांना टाळून इतर देशांमध्ये रशियन तेल वाहून नेणाऱ्या रशियन टँकर्सवरही कारवाई केली जाऊ शकते. टँकर्सचे हे जाळे रशियाचे 'शॅडो फ्लीट' (गुप्त ताफा) म्हणून ओळखले जाते. अमेरिकेने यापूर्वी रशियावर असे निर्बंध लादण्याचा प्रयत्न केला होता. तथापि, इराण युद्धादरम्यान होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे तेल पुरवठ्यावर परिणाम झाला आणि जागतिक तेल टंचाईची भीती वाढली. यानंतर, अमेरिकन सरकारला रशियन तेल विक्रीवरील निर्बंध तात्पुरते शिथिल करण्यास भाग पडले.

## राज ठाकरेंकडून......

दीर्घकालीन देखभाल असो की सायबर सुरक्षा असो यासाठी पैसा लागणार मग त्याची तरतूद अर्थसंकल्पात कायम स्वरूपी का नाही केली ? ग्राहकांनी २००० रुपयांपेक्षा जास्तीची खरेदी केली ०.४% एमडीआर लागू होणार ? आणि सरकारचं म्हणणं आहे की हा भार व्यापाऱ्यांनी सोसायचा, काय खात्री आहे की व्यापारी हा भार सोसतील आणि ग्राहकांच्या माथी तो मारणार नाहीत ? यासाठी काही यंत्रणा सरकारकडे आहे का ? उत्तर आहे अजिबात 'नाही'.

प्रश्न चार पैसे किंवा चाळीस रुपयांचा नाही. प्रश्न सरकारच्या हेतूचा आहे. नोटबंदी असेल किंवा डिजिटल पेमेंट व्यवहार असतील यात सरकारचे हेतू कधीच स्वच्छ दिसले नाहीत. णझख चालवण्याचा खर्च कोण करणार, याचा विचार व्यवस्था उभी करतानाच व्हायला हवा होता. जो केला नाही किंवा करायचा नाही असं आधीच ठरलं होतं. २०२२ ला अर्थ खात्याने असं स्वच्छ सांगितलं होतं. पण हे सांगताना मी म्हणलं तसं कधी तुमच्या खिशात हात घालायचा हे पण ठरलं होतं. आणि दोन माणसांच्या व्यवहारांवर शुल्क लावत नाही आहोत असले भंपक युक्तिवाद सरकारने करू नये. तुम्ही डिजिटल सापळा लावला आहे आणि त्यात प्रत्येक भारतीय आता अडकला आहे.